सौ. वसुंधरा पटवर्धन

शोध

कथासंग्रह

मूल्य अडीच रुपये

उदय साहित्य प्रकाशन, पुणें.

प्रकाशक
शि. ना. कोळमकर
उदय साहित्य प्रकाशन
९६ गंज, पुणें २.

मुखपृष्ठ
श्री. के. व्ही. फडके

मुद्रक
श्री. ना. चाफेकर
उल्हास मुद्रणालय
६८९।१-५ सदाशिव
नातुबाग पुणें २.

माझी प्रेमळ, बुद्धिमती, कर्तृत्वशालिनी व पतिपरायणा

आई

ती. सौ. इंदिराबाई खानविलकर

हीस सादर समर्पण

१ शल्य

२ अपघात

३ पराभूत

४ शोध

५ नावेंतील पाणी

६ हेलपाटे

१. .... शल्य !

कोणत्याहि लग्न झालेल्या मुलीला जें वाटत असतें, निदान वाटत असावें, तेंच शांताला वाटत होतें. मुलगी कोणत्याहि काळांतील असली, ती कितीहि सुधारलेली असली, शिकलेली असली, मोठेपणीं लग्न करीत असली तरी आपण आपल्या पतीशीं निष्ठावंत असावें ही श्रद्धा तिला सुखवीतच असते. त्याच्या आणि आपल्या जीवनाचा प्रवाह एक होऊन वाहावा या स्वप्नावर तिचें अपार प्रेम असतें. तिला निराळें व्यक्तिमत्त्व असलें तरी जी एकजीव झाली तिला आपलें जीवन नवऱ्याच्या जीवनापासून वेगळेपणानें काढावें हें अर्पणोत्सुक स्त्री-मनाला रुचत नाहीं. ज्याच्याशीं एक होऊन गेलों त्याच्यापासून भिन्नत्व कधीं आलेंच नाहीं, ही भावना स्त्रीला मोठी तृप्त करून सोडीत असते. मनच्या मनीं ती कृतार्थ होऊन जात असते. पतीपत्नीच्या जीवनाचा एवढा खोल आणि व्यापक अर्थ साऱ्याच स्त्रियांच्या मनांत असतो किंवा नाहीं कोण जाणें, पण तो शांताच्या मनांत होता. आणि म्हणूनच ती बेचैन झाली होती.

लग्न होऊन एक वर्ष झालें होतें. त्या एक वर्षाच्या अवधींत तीं दोघें साता जन्मींचीं जोडीदार होऊन बसलीं होतीं. आपल्या त्या संसारांत शांताचें मन कशानें तरी कांठोकांठ भरून गेलें होतें. जियें माणसाला आणखी कांहीं

नकोसें वाटतें तिथें ती पोंचली होती. जिथें समाधान तृप्त होतें तिथें ती आली होती. जें सांडून वाहून गेलें तरी भरलेलेंच राहावें असें कांहीं तरी अमाप, अजोड, अभंग तिला मिळून गेलें होतें. जें थोडयांना मिळतें, फार थोडयांना लाभतें, तें तिला मिळालें होतें !

पण काळ आणि घटना या दोन वस्तू अशा अभंग आहेत, कीं त्या फोडून वेगळ्या करतां येण्यासारखा एकहि उपाय अस्तित्वांत नाहीं. जें घडतें त्याचा ठसा त्या काळाच्या अदृश्य फलकावर कायमचा उमटून राहतो.

शांताच्या लग्नाआधीच्या आयुष्यांत अशी एक गोष्ट घडून गेली होती कीं जी तिला आज नको होती. ती घडली नसती तर बरें झालें असतें असें तिला आतां वाटत होतें. आज तसें वाटणें बरोबर होतें; कारण आज तें पाप होतें. जेव्हां घडलें तेव्हां तिला काय वाटत होतें कोण जाणें! माणूस तारुण्यांत कोणावर तरी प्रेम करतो. तें पाप नसतें कीं पुण्यहि नसतें. एखाद्या काळीं तें पुण्यहि होतें, दुसऱ्या एखाद्या वेळीं तें पापांत जमा होतें. लग्नापूर्वी शांतानें एका तरुण माणसावर प्रेम केलें होतें. तेव्हांहि ती अभिन्नत्व ही वस्तु समजूं शकत होती. चार मुली जें आपल्या प्रियकराशीं करतात तें तिनेंहि केलें होतें. त्यांतहि विशेष कांहीं नव्हतें. पण तिनें त्याला पत्रें लिहिलीं होतीं; पुष्कळ पत्रें लिहिलीं होतीं; आणि तीं सगळीच्या सगळीं आजतागायत त्याच्याचजवळ होतीं ! पहिल्या प्रेमांत जो भाबडेपणा सगळीं जणें करतात तोच तिनेंहि केला होता. आणि त्याचा तिला आतां पश्चात्ताप होत होता.

शांतानें आपल्या प्रियकराशींच लग्न कां केलें नाहीं हा मुद्दा आतां गौण झाला होता; अगदींच महत्त्वहीन झाला होता. कारण तिचें आतां लग्न झालें होतें आणि ती आपल्या नवऱ्यावरहि तसेंच प्रेम करूं लागली होती. किंबहुना, त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें म्हणूनच तें पहिलें सुटलें आणि याच्याशीं लग्न

झालें. लग्न झालें म्हणून हा नवरा झाला आणि झालें नाहीं म्हणून त्याचें स्वरूप वेगळें होऊन बसलें. तरी पण कायदेशीर लग्न होणें हा कायद्याचा म्हणूनच संरक्षणाचा आणि संस्काराचाहि भाग होऊन गेला होता. त्या प्रेमाचें महत्त्व आणि पावित्र्य संस्कारांच्या आधारानें महान् झालें होतें. शांताच्या नवऱ्याचाहि तिच्यावर फार जीव होता. पण म्हणूनच त्या पत्रांची शांताला फार भीति वाटत असे. आपल्या जीवनातील हें शल्य तिनें कधींहि आपल्या नवऱ्याला सांगितलें नव्हतें. तें सांगण्याचें धैर्य तिच्याजवळ नव्हतें; आणि तें सांगण्यांत कदाचित् अव्यवहारीपणाहि झाला असता. जो विषयच कधीं निघाला नाहीं त्याचा उच्चार मुद्दाम कां म्हणून करावा ?

पण तीं पत्रें ? साधींसुधीं नव्हेत, तर प्रेमपत्रें ! ज्याच्यावर तिनें एकदां प्रेमाचा वर्षाव केला आणि तिनेंच मग त्याला दंश केला, अशा त्या दुखाविलेल्या, चिडलेल्या, पराभूत माणसाजवळ तिचीं प्रेमपत्रें होतीं. तेव्हां तो तिचा प्रियकर होता. आतां तो . . . आतां तो . . . आतां तो तिचा खरोखरीच कोणी नव्हता. या सबंध वर्षांत तिनें त्याचें दर्शनसुद्धां घेतलें नव्हतें. तिच्या आईनेंच तिला तसें सांगितलें होतें. त्यामुळें तो निदान आज तरी खरेंच कोणी नव्हता. पण तीं पत्रें त्यानें कोणाला दाखविलीं असलीं तर ? तीं पत्रें घेऊन जर तो तिच्या नवऱ्यासमोरच येऊन उभा राहिला तर ? त्याच्याएवढा दावेदार या जगांत कोणी असेल काय ? जो प्रियकर होता तोच दावेदार व्हावा यापेक्षां जीवनाचा रंग पालटणें काय वेगळें आहे ? शांतानें थोबाडींत मारून घेतल्या. मनांतल्या मनांत ती स्थिाला शरण गेली आणि तिनें आपल्या दैवाला, मूर्खपणाला शिव्या दिल्या. प्रेम करण्यांत जास्त चूक कोणाची याचा तिनें काटेतोल विचार केला. चूक कोणाचीहि असो, पण अन्याय त्याला झाला असला तरी न्याय खरोखरी तिलाच मिळायला हवा होता. कारण ती आतां लग्न करून बसली होती. ती एका नवऱ्याची बायको झाली होती; एका घरची लक्ष्मी झाली होती. तिच्या-

साठीं नव्हे, पण तिच्या नवऱ्यासाठीं तरी पूर्वीच्या प्रियकरानें तीं पत्रें जाळून टाकावींत असें तिला फार वाटत होतें; फारफार वाटत होतें. खलनायक होऊन जर त्यानें आपल्याला दंश केला, तर या जीवनाचें काय होईल या भीतीनें ती अर्धमेली होई. स्वतःच्या उध्वस्त संसाराचें चित्र तिला घायाळ करून टाकी. स्वतःचें जीवित, स्वतःची अब्रू, स्वतःचीं सुखदुःखें माणसाला किती प्यार असतात!

पण असें नुसतें स्वतःशींच कळवळून जाऊन या भीतीचा शेवट होणार नव्हता. कांहीं तरी करून तीं पत्रें परत मिळवायला हवीं होतीं. तीं तिच्या हातांत आलीं असतीं कीं मग सारें संपणार होतें, सगळें सुरळीत चालणार होतें. आपण प्रेम केलें, पत्रें लिहिलीं, पाप केलें कीं पुण्य केलें हें आपोआपच नाहींसें होणार होतें. पण जोंपर्यंत पुरावा आहे–पुरावा... साधासुधा नव्हे, लेखी पुरावा, तोहि एका लग्न झालेल्या तरुण मुलीच्या हातचा–लेखी पुरावा... किती भयंकर गोष्ट होती! केवढी तरी स्फोटक वस्तु होती! त्याच्या जर मनांत आलें, त्यानें जर एकदां ठरविलें, त्याला नुसती कल्पना सुचली तरी प्रलयकाल कांहीं दूर नव्हता!

शांता डोकें धरून बसली होती. तिनें डोळे मिटून घेतले होते. त्या मिटल्या डोळ्यांना तिचा संसार सगळा पाण्यांत बुडतो आहे असें दिसत होतें. संसार नाहींसा होऊन आपण जिवंत राहावें हें फार वाईट असतें; पण तें तसेंच घडत असल्याचा तिला भास होत होता. हा आपल्याच मनाचा खेळ आहे हें तिला समजत होतें; पण तें असें अधूनमधून दिसेंच आणि तिला वाटे, माणसाच्या चुकीला क्षमा म्हणून नाहींच का या जगांत?

लग्न झाल्यापासून सर्वार्थानें ती आपल्या नवऱ्याचीच होती. चुकीची दुरुस्ती अशी होऊं शकत नाहीं? पण तिचें तिलाच वाटे, कीं जें घडलें तें

घडलेंच. या जीवनाचा नियमच असा आहे कीं जें घडायला हवें असून घडत नाहीं तेंहि घडलें असेंच होतें. बेरजेचे परिणाम होतात आणि वजाबाकीचे होत नाहींत असें थोडेंच आहे? मग जें खरोखरीच घडलें, ज्याचा लेखी पुरावा तूं भलत्याच माणसाच्या ताब्यांत भोळेपणानें ठेवून स्वस्थ राहिलीस, त्याचे परिणाम–त्याचे परिणाम... खरेंच तो काय करील? आपण पत्रें लिहायला नको होतीं; निदान तीं त्याच्याजवळ ठेवायला नको होतीं. त्याच्यावर आपण एवढा विश्वास टाकायला नको होता. परमेश्वरा, तीं पत्रें जर आपोआपच कुठें नाहींशीं होतील तर किती बरें होईल! शांताला वाटलें, कशानें तरी तीं लिहिलेलीं अक्षरें पुसून टाकावींत.

या विचारांना शेवट नव्हता. जागचें न हालून उपाय सुचणें शक्य नव्हतें. शांता उठली. तिनें कपडे केले आणि वाचनालयांत जावें म्हणून ती बाहेर पडली. रस्ता पायाखालचा होता, म्हणून ती चालत होती. नाहीं तर ओळखीच्या चेहऱ्यांचीहि आज तिला ओळख पटत नव्हती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला इमारती आहेत हें तिला कळत नव्हतें. आणि रस्त्यावरून माणसांच्या बरोबरीनें वाहनेंहि जात असतात याचा तिला अजिबात विसर पडला होता. भान नसलेल्या माणसाचें जें व्हावें तें तिचें झालें होतें. ती फक्त आपल्या पत्रांचा आणि त्याचा विचार करीत होती. खरोखरीच त्याचा स्वभाव कसा असेल? आपण त्याला खरेंच ओळखलें आहे? त्यानें त्या पत्रांचें काय केलें असेल? तीं कुठें ठेविलीं असतील? त्याच्या नकळत आपण तीं घेऊन येऊं शकूं काय?

•

तों तोच तिला अचानकपणें समोरच्या फूटपाथवरून जातांना दिसला! क्वचित् एखादे वेळीं तिला तो असा दिसत असे; पण आज ती विशेषच दचकली. पायांखालीं साप यावा तसें तिला झालें. जों जों पावलें टाकूं लागली तों तों पायाखालच्या जमिनीचा तुकडा कोणी ओढून घेऊं लागलें. वास्तविक

असें होऊं नये. किती जवळून ती त्याला किती तरी वेळां भेटली होती. आतां तो दुरून तिचें काय वाईट करणार होता ? शिवाय तिच्याकडे त्याची पाठ होती त्या रस्त्यावरून तीहि जाते आहे याची त्याला कल्पनासुद्धां नव्हती. तो समोर चालला होता. जिकडे ती चालली होती, ज्या दिशेला तिचें तोंड होतें, ज्या रस्त्याला तिची वाट होती तिकडेच त्याचाहि रस्ता गेला होता. दिशा, रस्ता, वाट एकच असावी, पण रस्त्याच्या दोन कडांना, एके काळीं एकजीव होऊन गेलेल्या त्या दोघांनीं चालावें हा दैवयोग विचित्र होता. कदाचित् तोहि वाचनालयांत चालला असेल. कारण त्याच्या हातांत पुस्तकें होतीं, मासिकाचा अंक होता आणि त्याची ती मध्यम उंचीची, मध्यम रुंदीची देहयष्टि नेहमीं-प्रमाणेंच मधल्या लयींत चालली होती. त्याची चाल, त्याची पद्धत, त्याचा स्पर्श, त्याचें बोलणें—सारें तिच्या ओळखीचें होतें. तो तिला जरी पाठीमागून दिसत होता तरी त्याचा चेहरा तिच्या समोर येतच होता. कारण, तोच चेहरा रात्रंदिवस पाहण्याचा छंद तिनें केला होता. तो छंद सुटला आणि हें अंतर निर्माण झालें !

लक्ष्मीरोडवरून एका कापडदुकानाजवळून ती चालली होती. आणि दहा-वीस हाताचें अंतर टाकून तो चालला होता. पण चालतां चालतां त्यानें रस्ता ओलांडिला आणि तो तिच्याच बाजूला आला. तरी पण तें अंतर...रस्त्यांतलें अंतर आणि परिस्थितीचें अंतर ! तिचें तिलाच कळेना. शांताच्या मनात आलें, कीं कसें होतें हें असें ? तो तिच्या कानाशीं तोंड नेऊन अनेक वेळां म्हणाला होता, "माझीच, माझीच !" तो शब्द, तो आवाज, तो विश्वास, ती जवळ येण्याची विलक्षण उत्कटता चालतां चालतां तिला सैरभैर करूं लागली. त्याच्या हाताचा तो मऊ, उबदार, प्रेमळ स्पर्श; त्याचीं तीं घाटदार सुंदर पावलें...डोक्यांत पाखरें उडावींत तसें होऊं लागलें, 'अरेरे ! तो हात आपण सोडून दिला. ज्या गोष्टीची शंकासुद्धां त्यानें कधीं घेतली नाहीं ती त्याला

आपण प्रत्यक्ष करून दाखविली. आपल्या स्वार्थासाठीं आपण त्याला आपल्या वाटेंतून अगदीं सहज दूर केला — जसें झुरळ झटकावें, जशी नुसती फुंकर मारावी. आणि आपल्या नवऱ्याशीं त्याच समरसतेनें, त्याच उत्कटतेनें, त्याच प्रेमानें ...'

पायाखालीं आलेल्या केळीच्या सालीनें आणि प्रेम या शब्दानें ती अडखळली. साल चुकवून तिनें पाऊल पुढें टाकलें. प्रेमालाहि असाच वळसा घालून आपण गेलों काय असें मनांत येऊन तिनें समोर पाहिलें. चौकांत पोलिसानें रस्ता रोखिला होता. गाड्या आणि माणसें थांबलीं होतीं. त्यांत तोहि थांबला होता. क्षणभर तीहि आपल्या ठिकाणीं थबकून उभी राहिली. पण पोलिसाचा हात खालीं येतांच तो पुन्हां चालूं लागला. आपल्याला भेटलेलें केळीचें साल त्यालाहि आड आलें असेल कीं नाहीं कोण जाणें ! पण त्यानें या हातांतलीं पुस्तकें त्या हातांत घेतलीं आणि तो किंचित् दुसऱ्या बाजूनें झुकून चालूं लागला. कोणत्या तरी एका बाजूला किंचित् कलतें होऊन मान तिरकी ठेवून चालावें अशी त्याला संवय होती. कुठें तरी तंद्री लागल्यासारखा तो न बोलतां चालत राही. ती विचारी, "कसला विचार करतां ?" "तुझाच ! " तो म्हणे. "म्हणजे कसला ?" "म्हणजे तुझ्या प्रेमाचा. कसं इतकं प्रेम करतेस तूं माझ्यावर ?"

प्रेम ! वहाण तुटावी आणि फरफटत चालावें. विश्वास, प्रेम या कल्पनांचें ओझें तिला असह्य होऊं लागलें ! खरोखरीच प्रेम ही वस्तु आहे का जगांत ? कीं विकार... आपल्या नवऱ्याशींहि आपण तेवढ्याच प्रेमानें, त्याच उत्कटतेनें वागतों. साऱ्या जगाचें भान विसरून जातों. आणि तरीसुद्धां निराळेपणानें आपल्या जुन्या मित्राबद्दलची एक सूक्ष्म ओढ आपल्याला आज ओढीत राहावी हें काय आहे ! ज्याच्याबद्दल एकदां प्रेम वाटून गेलें तें असें पुन्हां त्याच स्वरूपात

भासमान व्हावें हा दैवदुर्विलास होता. त्याच्याबद्दल आतां असें वाटतां कामा नये असें शांता स्वतःला बजावीत असतांनाच ती परिस्थिति विसरूं लागली—नुसत्या एका दर्शनानें !— रस्त्यांतल्या एका पाठमोऱ्या भेटीनें !— कपाटाच्या दाराची एक कांच सरकवून बंद करावी आणि दुसरी उघडावी तसें होत होतें.

वर्षभर हरवून गेलेली भावना आज शांताला वर्तमानकाळापासून तोडून त्या मागल्या एका क्षणापाशीं घेऊन चालली होती. त्याच्या दृष्टींत जेव्हां प्रेम होतें आणि एका झाडाखालीं बसून त्यानें तिचे हात जेव्हां आपल्या हातांत घेतले होते त्या क्षणापाशीं ती आली होती. त्या क्षणाच्या मागें आणि पुढें तेव्हां कोणताहि क्षण नव्हता. त्या वेळच्या त्या भावनेच्या मागें आणि पुढें दुसरी कोणतीहि भावना नव्हती. त्या क्षणाला आणि भावनेला कसलाहि स्पर्श होऊं शकत नव्हता. दिवे लागून गेले तरी ती एकच वेळ थांबून राहिली होती. उठायलाच हवें म्हणून जेव्हां तीं उठलीं तेव्हां वेळ निघून गेली असली तरी भावना मात्र अधिकच उत्कटतेनें हेलावत अधीरतेनें कशाला तरी अंतर्बाह्य व्यापून टाकीत होती... चालतां चालतां तें पुन्हा घडूं लागलें. तो थोडा पुढें चालला होता, ती मागून चालत होती. तो थांबला कीं ती थांबत होती.

वाचनालयाचा विचार आतां तिच्या डोक्यांतून नाहींसा झाला होता. वाचनालय मागेंच गेलें होतें आणि त्याला कोठें जावयाचें आहे तें तिला माहीतच नव्हतें; म्हणून तो थांबला तर ती थांबत होती; तो वळला तर ती वळत होती. वळावें, थांबावें, त्याच्या मागून जावें हें सगळें जसेंच्या तसेंच घडूं लागलें. फक्त तें त्याला माहीत नव्हतें. वर्षापूर्वींची कथा आपल्या मागून अशी वाटचाल करीत अचानकपणें येते आहे याची त्याला मुळींच कल्पना नव्हती. तो वर्तमानकाळांत होता; ती भूतकाळांत होती. तो विसरला नव्हता;

आणि ती विसरली होती. एक प्रकारें त्याच्या स्मृतीचें काय झालें असेल कोण जाणें, पण तिला मात्र तें सारें आठवूं लागलें. असें हें विसरणें आणि न विसरणें ! एकेका काळाचा गुणच असा असतो, कीं माणसाला विसरतांहि येत नाहीं आणि आठवितांहि येत नाहीं. तें स्मरण आणि तें विस्मरण अखेर तापदायकच होतें. शांताला स्मरण झालें– उशीर झाला होता, रात्र झाली होती. आकाशांत चंद्र नव्हता आणि जेथें दिव्यांचा झगझगाट असावा असा तो रस्ताहि नव्हता. ज्या वाटेनें तो तिला घरापर्यंत सोबत करायला निघाला होता ती वाट एका मैदानांतून जात होती. समोरचें कांहीं दिसत नव्हतें, मागें काय गेलें तें समजत नव्हतें. दूर कोठें तरी एखाद्या घरांतील दिवा अंधारच दाखवून देत होता. वृक्षानें वेलीला लपेटून घ्यावें, वेलीनें वृक्षाला बिलगून राहावें तशीं तीं दोघे त्या निर्जन रस्त्यानें चाललीं होतीं. कोणीहि कांहींच बोलत नव्हतें. न बोलतांहि समजूं शकतें तें समजण्यापर्यंत ते आलेले होते. शिवाय बोलत राहावें हा त्याचा स्वभाव नव्हता. पण मुळींच न बोलावें हा तिचा स्वभाव नव्हता. अखेर तिनें विचारलेंच, "हा रस्ता कुठें जातो ?"

"बरोबर जातो आहे."

"पण इथें तर कांहीं दिसत नाहीं !"

"हूं."

"तुम्हाला माहीत आहे वाट ?"

"हो."

"हो काय ?" लटक्या रागानें तिनें म्हटलें.

"मग काय, नाहीं म्हणूं ?"

"आपण चुकलों तर नाहीं ना ? वाट चुकून घरीं जायला उशीर झाला तर ?" तिनें नेहमीप्रमाणेंच शंका घेतली.

चालतां चालतां तो थांबला. त्या गडद अंधारांतच तिला आपल्यासमोर उभी करून त्यानें तिचे दोन्ही खांदे धरून हलविले आणि म्हणाला, "तुझी जबाबदारी मला समजते. कांहीं नाहीं तरी तुला मात्र मी संभाळूं शकेन!"

तिला आजहि असेंच वाटलें कीं यानें आपल्याला नीट सांभाळिलें असतें. आपल्याला यानें जिवापाड जपलें असतें. यानें आपलें संरक्षण केलें असतें. आपल्याला जें जें हवें तें तें याच्यापासून मिळालें असतें. आपण फुलपांखरा-सारखें वागलों नसतों तर हें सगळें आपलेंच होतें. जें आपलेंच होतें तें आज आपलें नसावें, याचें सूक्ष्म दुःख आपल्याला कां व्हावें तें शांताला कळेना. कारण तें तिच्या नवऱ्याकडून तिला मिळालेंच होतें. पण जें आपल्याला महत्त्वाचें वाटतें तें गरज नसतांनाहि मिळालें नाहीं कीं त्याला दुःख होतें हें तिला माहीत नव्हतें. ज्याच्यावर तिनें प्रेम केलें होतें तो तिच्या दृष्टीनें असाच महत्त्वाचा माणूस होता. तो दृष्टीला पडतांच त्याचें महत्त्व अधिकच वाटूं लागलें. त्याचें महत्त्व आज एवढें वाटलें नसतें तर?

पण जेव्हां आपल्यामुळें एखाद्याच्या जीवनांत दुःखाचें मोहोळ उठतें तेव्हां त्याचें महत्त्व कसें ना कसें पटतच जातें. त्याच्याबद्दल शांताला एकाएकीं फार दुःख होऊं लागलें. चालतां चालतां जेव्हां तो एका दुकानाशीं थांबून कांहीं चौकशी करूं लागला तेव्हां तो तिला बराच रोडलेला दिसला. याला आपल्या-शिवाय कोणीहि नव्हतें हें आठवून तिला रडावेंसें वाटूं लागलें. पश्चात्तापानें भरून गेलेल्या तिच्या मनाला या वेळीं नवऱ्याची आठवण अंधुक होऊन गेली होती. दूरची गोष्ट एखाद्या दिवशीं अगदीं जवळची होऊन जावी तसें तिचें झालें होतें. तो समोर आला, त्यानें आपल्या डोळ्याला डोळा दिला, तर आपण त्याच्याकडे पाहूं शकणार नाहीं, आपले हातपाय कापूं लागतील हें तिला आतांच दिसूं लागलें. ती त्याला पाहात होती. आपल्याला मात्र त्यानें पाहूं नये असा तिचा प्रयत्न होता,

तेवढ्यांत कसलासा पुडा घेऊन, दुकानदाराला पैसे देऊन तो निघाला तो तिच्याच रोखानें. त्याचें तोंड आतां सरळच तिच्या चेहऱ्याकडे झालें. आपण काय करावें हें शांताला समजण्यापूर्वींच तो पांचदहा पावलं चालून आला होता. त्यानें तिला पाहिलें होतें. शांताचे पाय जड झाले; जागच्या जागीं खिळा मारल्यासारखी ती झाली. ओढलेल्या चेहऱ्यानें, सुकलेल्या घशानें ती रस्त्यावर तशीच उभी राहिली. तिच्याकडे पाहात हळूंहळूं तो तिच्याजवळ आला. समोर आला आणि तिनें जेव्हां ओळखीचें चिन्हहि दाखविलें नाहीं, तेव्हां तो तसाच पुढें निघून गेला !

शांताला ब्रह्मांड आठविलें. सबंध पृथ्वी डोक्यावरून गेली आणि केवळ ती मात्र उरली ! एक जुनी पण एके काळीं अतिशय प्यार असणारी दुनिया पाण्याच्या लोंढ्यासारखी वाहून गेली आणि शांता एखाद्या काटकीसारखी वर आकाश आणि खालीं पाणी अशा स्थितींत हेलकावत राहिली ! एक प्रचंड, भयानक पण निःशब्द घटना तिला गुदमरून टाकूं लागली. त्याच्या रूपानें एक अनामिक, अमूर्त दुःख तिच्या समोरून अबोलपणेंच निघून गेलें. शांताला वाटलें, कीं आपण चुकलों, फार चुकलों. अनेकदां याच्याच गळ्यांत आपण आपला गळा घातला होता; याच्याच जवळ आपल्या सुखदुःखाचें गाठोडें देऊन आपण मोकळें झालों होतों. आपल्यासाठीं वेड घेऊन बसलेल्या या माणसाशीं आज आपण नुसतें बोललोंसुद्धां नाहीं. आपलें लग्न झालें आहे, आपण एका पुरुषाच्या जीवनाशीं मिसळून गेलों आहोंत आणि ज्याच्याकडे आपण आतां पाहतों आहोंत तो एक परका पुरुष आहे हें तिच्या मनांतून जणूं नाहींसेंच होऊं लागलें ! त्याला पाहून ती कळवळून गेली. धावत जावें आणि त्याला हांक मारावी, त्याच्याशीं बोलावें, त्याला भेटावें अशी एक अनावर ऊर्मि तिच्या मनांत उसळून आली. फाटत चाललेल्या त्या वस्त्राचें पुन्हा एकदां महावस्त्र होऊन जावें अशी उत्कट वासना तिला बेचैन करूं

लागली. कोमेजलेली फुलें कशानें तरी पुन्हा टवटवीत होऊन जावींत असला उन्माद तिच्या अंतःकरणांत दरवळूं लागला. पण दुसऱ्याच क्षणीं तिचें लग्न, तिचीं पत्रें, तिचा नवरा–सारें तिला आठविलें आणि ती तिथेंच थांबली. एखादाच क्षण किती मोठा असतो! पण इतर अनंत बारीक क्षण मिळून त्याला खाऊन टाकतात.

माणसाला भावनेवर जगून चालत नाहीं असें तिनें आपल्या मनाला शिकविलें होतें. व्यवहार! व्यवहार हवा. तोहि आपला आत्तां चुकलाच. विवाहापूर्वीच्या प्रेमाचा आपला लेखी पुरावा–तो पुरावा आज त्याच्याजवळ असतांना तरी आपण त्याच्याशीं असें वागायला नको होतें. त्याच्यासाठीं नाहीं तरी निदान स्वतःच्या सुरक्षिततेसाठीं तरी आपण हा निष्ठुरपणा करायला नको होता. आतां तो आपला घात करणार! सर्वस्वी नाश करणार. जें संपून जाईल असें आपण म्हणत होतों तेंच मुद्दाम खणून काढल्यासारखें पुन्हा सुरू होणार. आपण त्याला असें दुखवायला नको होतें. त्यानें तरी आपला नाश कां करूं नये? अजूनहि त्यानें आपल्याशीं प्रेमानेंच वागावें असें म्हणण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? त्याच्या दुःखी पण चिडलेल्या नजरेनें आपण ओळखायला हवें होतें. कांहीं तरी विपरीत घडणार असें घोकीत ती वाचनालयांत न जातांच घरीं परतली.

सकाळीं उठल्यावर विसकटलेले केस नीट करावेत, चुरगळलेलें पातळ साफ करावें, पारोसा चेहरा स्वच्छ करावा व एकदांचें टाकटीक होऊन जावें तसें तिनें आपले उधळलेले विचार सावरले. पूर्वीं कांहींहि घडून गेलें असलें आणि आज हळवेपणानें कांहींहि वाटत असलें तरी त्या पत्रांचा निकाल लागणें जरूर होतें. आणि त्यावर फक्त एकच उपाय होता: त्याच्याजवळ तीं पत्रें मागणें. पण त्याच्याकडे जाणें, त्याच्याशीं बोलणें, पत्रें मागणें हें खरोखरी सोपें नव्हतें. पण काम लांबणीवर टाकल्यानें तें सोपें थोडेंच होणार होतें!

संकटाच्या नुसत्या सावलीनें एकसारखा पाठलाग करीत राहावें हें तिला सहन होईना. मानेवर टांगलेली तलवार एकदां मानेवर तरी पडूं दे नाहीं तर मोडून तरी जाऊं दे अशा निर्वाणीच्या अवस्थेला शांता आली होती.

तरीसुद्धां एकटीनें जाण्याचें धैर्य तिला झालें नाहीं. जातांना एका छोट्या मुलाला ती बरोबर घेऊन गेली. पांचसहा वर्षांच्या त्या बोबड्या, अजाण मुलाचा तिला आधार वाटत होता. धडधडत्या छातीनें त्याचें बोट धरून ती आंत गेली. कांहीं घडलेलेंच नाहीं आणि आपण सहजच आलों आहोंत असें दाखविण्याचा ती प्रयत्न करूं लागली. तो मात्र चकित होऊन दोन मिनिटें नुसता पाहातच राहिला. प्रत्यक्ष परमेश्वर समोर येऊन उभा राहिला असता तर त्याला एवढें आश्चर्य वाटलें नसतें. भानावर येऊन त्यानें सतरंजीकडे बोट केलें आणि म्हणाला, " बैस ना."

नेहमीसारखेंच दिसावें म्हणून ती अळेंबळेंच हसली. आणि आपला चेहरा बदलतो आहे हें तिचें तिलाच समजलें. तिला वाटलें, ' तूं कां आलीस ? कशाला आलीस ? काल कां बोलली नाहींस ? चालती हो ! माझ्या घराची पायरी चढूं नकोस.' असें फाडफाड बोलून तो आपल्या नवऱ्याचाहि मत्सर करील. त्याच्याबद्दलसुद्धां तो वाईटसाईट बोलेल– आणि घालूनपाडून बोलण्याची संधि फुकट घालविणार नाहीं. गरगरत्या मनानें ती या वाक्यांची वाट पाहात राहिली. कांहीं तरी चाळा म्हणून तिनें बरोबरच्या मुलाला जवळ बसवून घेतलें आणि त्याच्या हाताचीं बोटें ती मोजूं लागली. शेवटीं त्यानेंच विचारिलें, " हा मुलगा कुणाचा ? "

" शेजारचा आहे. " अजून तिनें त्याच्या चेहऱ्याकडे नजर वळविली नव्हती. अपराधी मन भित्रें असतें. ती बोलायलाच भीत होती. पुन्हा त्यानेंच विचारिलें, " काल कुठं दुकानांत गेली होतीस ? "

अगदीं सहज विचारावें तसें त्यानें विचारिलें. तो रागावला नाहीं याचें तिला आश्चर्य वाटलें. अखेर तिनें मान उचलून त्याच्याकडे पाहिलें, तों तो पूर्वीचाच लाघवी चेहरा, तीच पूर्वीची प्रेमळ दृष्टि, तेंच जुनें तिला नेहमी लोभस वाटणारें तिच्याबद्दलचें त्याचें आगत्य... तें पूर्वीचें सारें जसेंच्या तसेंच कायम होतें. समुद्राच्या लाटांच्या आघातांनीं वाळू भिजावी पण झिजूं नये तसें त्याचें तिच्या विषयींचें हळवेंपण अभंग राहिलें होतें.

त्याच्या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें. पण काय दिलें तें तिचें तिलाच समजलें नाहीं. आपण ज्यासाठीं आलों आहोंत तें काम आपल्या हातून होईल किंवा नाहीं याची तिलाच शंका वाटूं लागली. एव्हाना तो मुलगा उठून खिडकींतून बाहेरचीं माणसें पाहूं लागला होता आणि थोड्या वेळांतच तोहि कशाला तरी आंतल्या खोलींत गेला. तेव्हां शांतानें खोलींत इकडे तिकडे पाहून घेतलें. कोपऱ्यांत दोनतीन ट्रंका होत्या आणि त्यांना कुलुपें नव्हतीं. बिनकुलपांच्या ट्रंकेंत त्याचे पैसे कसेहि टाकलेले असत तें तिला माहीत होतें. पैशासारख्या क्षुल्लक गोष्टीची तो फिकीर करीत नव्हता हें तिला चांगलें ठाऊक होतें. त्यानें फक्त तिच्या प्रेमाची फिकीर केली होती. तरीसुद्धां या उघड्या ट्रंकेंत जर तीं पत्रें असतील तर– तर– तीं कोणीं वाचलींहि असतील आणि जर वाचलीं असतील तर त्यांतली कांहीं हरविलींहि असतील. अनेकांना तें समजलें असेल आणि अनेकांच्या जवळ ते लेखी पुरावे...

तेवढ्यांत एक बशी घेऊन तो आला. ती तिच्यापुढें करून त्यानें म्हटलें, " बरेच दिवसांनीं आली आहेस. तुला कांहीं द्यावं असं वाटत होतं. पण घरांत कांहींच सांपडलं नाहीं. फक्त शेंगाचे दाणे आहेत. चालतील तुला ? "

" चालतील ना ! " शांता कसेंबसें म्हणाली. त्याच्या चांगुलपणानें ती भारून गेली होती. आतां तीं पत्रें त्याच्याजवळ मागणें तिला मुर्दाडपणाचें

वाटूं लागलें. त्याच्याबद्दल अशा रीतीनें अविश्वास व्यक्त करणें निष्ठुरपणाचें झालें असतें. एकेक दाणा ती तोंडांत टाकीत राहिली. चार दाणे तिनें त्याच्याहि हातांत दिले. ते दाणे तो या हातांतून त्या हातांत घोळवीत राहिला. त्या शेंगदाण्यांतहि एक हळवी स्मृति जागी होत होती. पण तें सुख संपलें होतें आणि हळवेपणा मात्र शिल्लक होता! जें तिला आठवत होतें, तें त्यालाहि दिसत असलेंच पाहिजे, याची तिला खात्री होती. वेळ अशी चमत्कारिक, अवघड होती, कीं कोणी तरी बोलायला हवें होतें. पण मना-पासून, जवळ येऊन कांहीं बोलावें अशी अवस्थाच येत नव्हती. व्यवहाराचें आणि दूर राहून बोलावें हें त्यांना कधी माहीत नव्हतें. अखेर मनाचा हिय्या करून शांता म्हणाली, " माझं एक काम होतं."

" काय ? "

" माझीं पत्रं तुमच्याजवळ आहेत ना ? "

" होय."

" मग तीं मला हवींत. आत्ता द्या."

दुखावलेल्या शब्दानेंच त्यानें विचारिलें, " कशाला हवीं आहेत ? "

" असं वाटतं, कीं तीं आतां ठेवूं नयेत. जाळून टाकावींत."

" कां ? "

" कारण कांहीं नाहीं. द्या ना तीं. मला हवीं आहेत."

थोडा वेळ तो तसाच खुर्चीवर बसून राहिला. तो कांहीं तरी गिळत होता. सगळेंच घेऊन गेलेल्या या मूर्ख मुलीला हें अखेरचें कसें द्यावें आणि कफल्लक व्हावें याचा तो विचार करीत होता. हळवें होऊन विचार करावेत म्हणजे जे

कष्ट होतात ते त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होते. दोन्ही हात खुर्चीच्या हातावर ठेवून एकमेकांत गुंतवून तो शांतपणें बसून राहिला होता. वेळ जाऊं लागला तसतशी शांता अस्वस्थ होऊं लागली. तो कांहींच बोलेना, तेव्हां तिनें विचारिलें, "तुम्ही देणार नाहीं तीं ?"

"मी काय करीन असं वाटतं तुला ?"

"मला सांगतां येत नाहीं; पण तीं मला हवीं आहेत. द्या ना. लौकर द्या, आत्ता द्या."

खुर्चीतून उठत तो म्हणाला, "उद्यां ये."

"उद्यां द्याल ? आज कां नाहीं देत ?" तिनें खुळ्यासारखें विचारिलें. स्वतःचा घात होतो आहे या कल्पनेनेंच ती अर्धमेली झाली.

"उद्यां ये तूं."

पत्रें देईन किंवा नाहीं तें त्यानें कांहींच सांगितलें नाहीं. अस्वस्थ, भित्र्या मनानें ती पुन्हा त्या मुलाचें बोट धरून त्याचा निरोप घेऊन निघाली. ती दिसेनाशी होईपर्यंत तो आपल्याकडे पाहात उभा आहे हें तिच्या पाठीलाहि दिसत होतें.

दुसऱ्या दिवशीं ती पुन्हा आली. आज त्या मुलाला तिनें बरोबर आणिलें नव्हतें. आपण हळवें व्हायचें नाहीं असें तिनें ठरविलें होतें. कसेंहि करून आणि कांहींहि करून तीं पत्रें मिळवायचींच असें तिनें निश्चित केलें होतें. कारण अखेर तेंच कल्याणाचें होतें. तसें एकदां झालें म्हणजे तें मागलें संपून जाणार होतें. त्याचेंहि आयुष्य सुखाचें व्हावें अशी तिची फार इच्छा होती. केवळ इच्छाच नव्हती, तर तळमळ होती. दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें त्यानें सुखी व्हायचें ठरविलें असतें तर तिनें त्याला हरएक प्रकारें मदत केली असती. अजूनहि शांताचें त्याच्यावर प्रेम

होतें. तो सुखी झाला असता तर तिच्याएवढा आनंद जगांत कोणालाच झाला नसता.

त्याचें दार उघडेंच होतें– तिच्यासाठीं त्याचें दार सदाचेंच उघडें होतें. ती आज येणार होती हें त्याला माहीत होतें. तो वाटच पाहात होता. ती आल्यावर त्यानें तिच्यापुढें फळें आणून ठेविलीं, दुधाचा कप आणून ठेविला. आणि म्हणाला, " तो काल्चा मुलगा नाहीं आला आज ? "

" नाहीं आणला त्याला. तो मग कंटाळून जातो. मोठ्या माणसांत त्याला काय इंटरेस्ट वाटणार आहे ! "

" त्याच्यासाठींहि मीं दूध आणून ठेवलं होतं म्हणून विचारलं.

" तुम्ही घ्या ना."

" मला नको आहे."

" मग हीं फळं घ्या."

" भूक नाहीं मला."

" मग मलासुद्धां भूक नाहीं."

" असं कसं ! माझी पाहुणी आहेस तूं. पुन्हा कधीं येशील किंवा नाहीं... तूं दूध घेतलं नाहींस तर मला बरं वाटणार नाहीं."

" पण मला एकटीनं घ्यायला बरं वाटत नाहीं. घ्या ना. घ्या हो, एखादी फोड घ्या." तिनें बळेंच त्याच्या हातांत पेरूची फोड ठेविली.

कोणीच खोटें बोलत नव्हतें. तरीसुद्धां त्याचें म्हणणें ज्या अर्थानें आणि जितकें खरें होतें, त्या खरेपणाशीं तिच्या खरेपणाची तुलनाच होऊं शकत नव्हती.

दुधाचा कप रिकामा करून ती उगाच बसून राहिली. अधूनमधून घड्याळाकडे पाहूं लागली. त्याच्या तें सगळं ध्यानांत येत होतं; पण तो गप्प होता. शेवटीं शांता म्हणाली, " माझीं पत्रं द्या ना."

" किती दूर निघून गेली आहेस तूं, शांता! पण मागते आहेस मात्र त्याच हक्कानं, जशी पूर्वी मागत होतीस. तूं कुठें आहेस हें माहीत आहे का तुला ? "

ती कांहींच बोलली नाहीं. ती बोलूंच शकत नव्हती. तोच म्हणाला, " कशाला हवीं आहेत तीं पत्रं तुला ? "

" मी जाळून टाकणार आहे तीं."

" कां ? "

" कुणाच्याच जवळ आतां तीं नसावींत असं मला वाटतं. " शांताची दृष्टि स्वतःच्या पायांकडे होती.

" तुझ्याजवळ राहिलीं तर काय होईल असं वाटतं तुला ? "

" तर तीं माझ्या नवऱ्याला दिसल्याशिवाय राहणार नाहींत. "

" आणि माझ्याजवळ राहिलीं तर ? "

" तुमच्याजवळ ... तुमच्याजवळ असलीं तर कांहीं बिघडणार नाहीं, पण तीं नकोतच कुठें असायला."

" त्याचा मी दुरुपयोग करीन असं वाटतं तुला ? "

" नाहीं.

" वर पाहा शांता. तुला तसंच वाटतंय्. खोटं बोलूं नकोस. तसं वाटलं म्हणूनच तूं मागायला आलीस. वाटलं कीं नाहीं तुला ? खरं सांग. "

"होय!" म्हणून तिनें कशी तरी मान हलविली. तेव्हां तो म्हणाला, "म्हणजे, तूं अजून विसरली नाहींस तर! आपण त्या पत्रांतून काय लिहिलं आहे याची तुला आठवण आहे म्हणायची."

तो मर्मावरचा आघात मुकाट्यानें सोसून घेणेंच भाग होतें. त्या पूर्वीच्याच पद्धतीनें तिनें म्हटलें, "रागावलांत तुम्ही?"

"मला राग येत नाहीं असं वाटत होतं ना तुला? खरं आहे तें. लैला-मजनूच्या गोष्टी बोलून तूं माझी टिंगल केलीस अखेर. तरीसुद्धां तुझ्यावर रागवायचं मला जमलेलं नाहीं. तुझ्यावर रागावणं, तुझा सूड घेणं, तुझ्या सौख्यांत बिब्बा घालणं या गोष्टी माझ्या हातूनं होणार नाहींत. असल्या गोष्टींचे परिणाम काय होतात तें न कळण्याइतकी तूं मूर्ख आहेस असं मला वाटत नाहीं. तुला मूर्ख म्हणावं याचं दुःख होतं मला, शांता. पण मला वाईट निराळ्याच गोष्टींचं वाटलं. कशीहि वागली असलीस तरी– तरी माझ्यावर तुझा विश्वास असेल असं मला वाटलं होतं. तूं मला ओळखलं असशील अशी माझी समजूत होती. पण तुला माणसं ओळखतां येत नाहींत; भेटलीं तरी ओळख दाखवितां येत नाहीं. तुझ्या समजुतीखातर तुझीं पत्रं... वास्तविक तीं माझीं आहेत– पण जें माझं आहे तें तुझ्यापासून निराळं राहूं शकत नाहीं– कालच देणार होतों पण नाहीं दिलीं."

थोडें थांबून त्यानेंच विचारिलें, "कां, म्हणून नाहीं विचारलंस? रात्रभर तीं वाचीत होतों. म्हटलं, आतां एक दिवसाचीच सोबत आहे. पाहिलींस? पाहून घे सगळीं. एवढींच होतीं ना? माझ्याजवळ मीं कांहीं ठेवून घेतलीं आहेत असं वाटतं का तुला? वाटलं तर पेटी पाहून घे. दाखवूं का तुला?"

रेशमी रुमालांत बांधलेलीं तीं पत्रें आणि जिच्यांत ठेविलीं होतीं ती चंदनाची पेटी त्यानें तिच्या स्वाधीन केली; आणि तिनें ती घेतली. ती घेऊन

जाण्यासाठींच ती आली होती. पण एखाद्या माणसाची उत्तरक्रिया करितांना जें व्हावें तें तिचें झालें होतें ! चंदनाच्या पेटीचा सुवास आज मरून गेला होता, आणि त्या पत्रांच्या दर्शनानें स्वतःचें लग्नच तिला पाप वाटूं लागलें. न बोलतां नुसती बधिर मनानें ती बसून राहिली. त्याचें बोलणें तर आधींच संपलें होतें. आतां सगळेंच संपलें होतें !

लग्नापूर्वींच्या प्रेमाचा पुरावा– लेखी पुरावा आतां तिच्या हातीं आला होता आणि थोड्याच वेळांत त्याची राख होणार होती. आतां सगळें संपणार होतें. करायचें म्हणून जेवढें कांहीं होतें तें संपून गेलें होतें. दोघांच्याहि हातां- तून कांहीं तरी निसटून गेलें होतें. दोघंहि कांहीं तरी महत्त्वाचें, फार महत्त्वाचें गमावून बसलीं होतीं. दोघांचेंहि कांहीं तरी जिवाभावाचें हरपून गेलें होतें. देखतां देखतां कोणत्या तरी अमोल गोष्टीचा मृत्यु झाला होता. ती गोष्ट त्या दोघांची मिळून होती; पण सर्वांत वाईट झालें होतें ती आणखी निराळीच गोष्ट होती. एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून शोक करण्याची वेळ केव्हांच निघून गेली होती. हातीं पुरावा असतांना हायसें वाटण्याचें सौख्य तिला होऊं शकत नव्हतें. शल्य अधिकच खोल रुतून बसलें. तो निदान तिच्याकडे पाहात होता; ती पाहूं शकत नव्हती. अखेर पत्रांची पेटी हातांत घेऊन खालच्या मानेनेंच ती 'जातें' म्हणाली. आणि तो दारांत येऊन उभा राहिला– कालच्यासारखाच ! कालच्यासारखेच आजहि तिच्या पाटीला डोळे आले होते. आणि तो तिला पाहात होता हें त्यांना दिसत होतें.

घरीं येऊन पत्रांचा मोठा जाळ झाला तरी तो पुरावा कांहीं केल्या नाहींसा होईना. जें केवळ कागदांच्या आधारानें शल्याच्या रूपांत जिवंत होतें तें जाळून टाकिलें तरी शांताच्या अंतःकरणांत अधिकच प्रज्वलित झालें. तें जोंपर्यंत तिच्यापासून नाहींसें होत नव्हतें तोंपर्यंत तें या जगांतून नाहींसें होणें शक्य नव्हतें.

२. .... अपघात

चार दिवसांसाठीं नेलेले पैसे एखाद्यानें वर्षांनुवर्षें परत करूं नयेत याला काय म्हणावें? तो माझा स्नेही होता, अगदीं जुना मित्र होता, म्हणून त्याच्याकडून मीं व्याजाची अपेक्षा केली नाहीं. एवढेंच काय, पण गेल्या दीड तपांत मीं त्याला मुद्दलाचीसुद्धां जाणीव दिली नाहीं. कारण चार लोकांत आम्ही एकमेकांचे फार जुने स्नेही म्हणून वागत होतों. आमचा पैशाचा व्यवहार जगांत तिसऱ्या माणसाला माहीत नव्हता. त्याला दिलेल्या कर्जाची जाणीव त्याला न देणें हें माझ्या इतकें अंगवळणी पडून गेलें होतें कीं, ती जाणीव माझा मीच विसरल्यासारखा झालों होतों. सार्वजनिक जीवनांत अगर घरगुती कामकाजांतहि आमचें साहचर्य एवढें विलक्षण होतें कीं, लोक आमचा 'राम-लक्ष्मण' म्हणून उल्लेख करीत. रात्रीं बारा-बारा दोन-दोन वाजेपर्यंत आम्ही एखाद्या विषयावर बोलत बसावें, मात्र मीं दिलेल्या या कर्जाचा नांवालासुद्धां उल्लेख होऊं नये, हें इतकें ठरून गेलें होतें कीं, मीं त्याला कधीं काळीं पांच हजार रुपये उसने दिले होते, हें आतां माझें मलासुद्धां खरें वाटेनासें झालें होतें. आणि त्याचेंहि वागणें या व्यवहारापासून इतकें अलिप्त होतें कीं, आपलें बारसें जसें कोणाला आठवूं नये तसें माझें कर्ज तो साफ विसरून गेला होता. एक दिवशीं रात्रीं दहा वाजतां येऊन, मला झोपेंतून उठवून त्यानें माझ्याकडून चार दिवसांसाठीं पांच हजार रुपये मागून नेले होते, ही घटना म्हणजे

माझा जणूं एक गोड भ्रम होता. त्याला तरी तें कधीं आठविलेलें मला दिसलें नाहीं. आणि मला तरी ती घटना आतां आठविते आहे याचें कारण तो कायदेशीर कागद,– ज्याच्यावर अठरा वर्षांपूर्वीची तारीख आहे, ज्याच्यावर माझ्या या मित्राची सही आहे. तो कागद आज, आत्तां, या क्षणीं माझ्याजवळ आहे म्हणूनच ती घटना घडली होती हें खरें आहे. तो कागद जर जाळून टाकिला, कोठें तरी गहाळ झाला तर हें कर्जाचें प्रकरण आमच्या दोघांच्या आयुष्यांत कधीं घडलेंच नव्हतें, त्याला कांहींच अस्तित्व नव्हतें, त्यानें माझ्याजवळ कधीं पैसे मागितले नव्हते आणि मीं ते कधीं दिले नव्हते. काळाच्या पडद्यावर हा ठसा कधीं उमटलाच नव्हता. संवयीमुळें विस्मरणांत जमा झालेली गोष्ट, किंबहुना विस्मरणाच्या संवयीमुळें अस्तित्वच नष्ट झालेली ही घटना केवळ त्या कागदामुळेंच आजवर अस्तित्वाची खूण पटवून देत राहिली होती. नाहीं तर हें सारें खोटें होतें. म्हातारपणच्या पंगु स्मरणशक्तीनें दिलेला हा खोटाच झोका होता. जें घडलेंच नाहीं तें घडलें असल्याची खात्री वाटणें हा त्या वृद्धापकाळाचा चमत्कार होता. एकच गोष्ट खरी होती.– अगदीं आठ-पंधरा दिवसांपर्यंत खरी होती– कीं रात्रीं दोन-दोन वाजेपर्यंत गप्पा मारून आम्ही एकमेकांना एकमेकांच्या घरापर्यंत सोबत करीत असूं. मी त्याला पोंचवावें आणि त्यानें मला पुन्हा सोबत करावी, असें तासतासुद्धां चाले. चालतां चालतां आम्ही रस्त्यांत उभे राहून पुन्हा बोलूं लागावें आणि त्यांत पहांट उजाडून जावी. लोक आमच्या या लोकविलक्षण मैत्रीकडे अचंब्यानें पाहात; आणि म्हणूनच माझ्या या मित्राकडे दिलेले पैसे परत मागण्याचें धाडस मला कधीं झालें नाहीं.

पण होय. पंधरा दिवसांपूर्वीं ते दीड तपापूर्वीचे पैसे मीं त्याच्याजवळ मागितले. मी तरी काय करणार ? हे महागाईचे दिवस. मला माझ्याजवळचे पैसे कमी पडूं लागले. वृद्धापकाळामुळें आणि दुखण्यामुळें माझ्या हातून आतां

कामधंदा होत नाहीं. गेलीं दहा वर्षें मी नुसता बसून खातों आहें. मुद्दलांतलेच पैसे खर्च करतों आहें. ज्या एका पद्धतीच्या राहाणीनें मी या जगांत राहिलों तो दर्जा मला कायम राखायचा आहे. नव्हे, राखणें भाग आहे. पण तो दिमाख जसाच्या तसा ठेवायला पैसा हवा, तो मात्र मी आतां मिळवूं शकत नाहीं. अशा वेळीं विसरलेल्या 'येण्या'चें मला स्मरण झालें तर काय नवल ? मीं माझे पैसे त्याच्याजवळ मागूं नयेत तर काय करावें ?

म्हणून गेले आठ दिवस मी त्याच्याकडे खेटे घालतों आहें. आज देतों, उद्यां देतों, परवां देतों, असे वायद्यांवर वायदे तो करतो आहे आणि मी हेलपाटे मारतों आहें. पांच हजार एका रकमेनें त्यानें द्यावेत असें त्याचें सामर्थ्य नाहीं हें मला माहीत आहे. पण नसेल तर मी काय करणार ? मी किती वर्षें थांबूं ? स्नेहाची चाड, मैत्रीचा लोभ, म्हणून गेलीं अठरा वर्षें तर मी थांबलोंच आहें ना ? आणि तरीसुद्धां आणखी थोडें थांबायला सांगायला त्याच्या जिवाला एवढासुद्धां संकोच वाटूं नये याचें मला फार आश्चर्य वाटलें. अजूनसुद्धां थांबायचें मीं ठरविलें तर हा वायदा माझ्या हयातींत पुरा होईल असें मला वाटत नाहीं.

पण वरचेवर मागणी केल्यामुळें त्याची माझ्याबद्दलची भावना आतां बदलूं लागली आहे. मला पाहिलें कीं त्याच्या कपाळाला आंठ्या पडतात. माझ्याकडे पाहाण्याची त्याची दृष्टि आतांशा अशी क्रोधी झाली आहे कीं, जणूं कांहीं मींच त्याचें कर्ज घेतलें आहे ! जणूं कांहीं मींच त्याचा अपराध केला आहे. रोजच्या रोज मला भेटल्याशिवाय ज्याला चैन पडत नसे, त्याला आतां माझें नुसतें दर्शनाहि अप्रिय होऊन बसलें आहे. मैत्रीचा ओलावा या पैशाच्या मागणीनें जणूं आटून गेला आहे, आणि तेथें नुसतें व्यवहाराचें वाळवंट होऊं घातलें आहे. माझ्याकडे पाहून तो आतांहि हंसतो, पण तें हास्य दिलखुलास नसतें. चेहऱ्यावरच्या त्या औपचारिक स्मितरेषा पुसल्या जातात, आणि त्यांऐवजीं

कपाळावरच्या आंठ्या इतक्या तत्परतेनें पुढें येतात कीं, मला स्वतःला कांटेरी कुंपणावर अवघट्टून बसल्यासारखें वाटतें. पैशाची बाब आली कीं मैत्रीचा गोडवा कसा कडवट्टं लागतो याचा अनुभव मी रोज घेतों आणि मनांत येतें कीं, मीं दिलेल्या पांच हजार रुपयांच्या मोबदल्यांतच गेलीं अठरा वर्षे त्यानें माझ्याशीं अकृत्रिम स्नेह ठेविला होता काय ? आणि ते माझेच पैसे मीं त्याच्याकडे मागतांच तो स्नेह जर असा संकोचून एक दिवस आयोडिनसारखा उडून जाणार असेल तर तो अकृत्रिम कसा म्हणावा ?

कृत्रिम-अकृत्रिम यांचा काथ्या कितीहि कुटला तरी आर्थिक चणचण भासूं लागली कीं, हा कडवटपणा टाळून पुढें जातां येत नाहीं त्याला काय करावें ?

म्हणून मी आज पुन्हा त्याच्याकडे निघालों होतों. काल संध्याकाळीं त्यानें मला सांगितलें होतें कीं, ' माझ्याजवळ पैसेच नाहींत. कुठून तरी व्यवस्था करून मी तुमचे पैसे शक्य होतील तेवढे उद्यां देतों. उद्यां दुपारीं बारा ते दोन एवढ्यांत तुम्ही या.'

भर बारा वाजतां माणसाला फांशींसुद्धां देत नाहींत. आणि यानें तर मला एवढ्या सहासष्ट वर्षांच्या वयाला, माझी शक्ति क्षीण झालेली असतांना, दुपारीं बारा वाजतांच्या ' थंड ' वेळेला बोलाविलें होतें. पण म्हटलें, आपले पैसे मिळायचे आहेत. बारा वाजतां तर बारा वाजता ! पण चोराच्या हातची लंगोटी सोडतां कामा नये.

म्हणून मी निघालों होतों. जेवून घेतलें नव्हतें. कारण जेवण झाल्यावर माझें शरीर जड होतें, आणि मग माझ्यानें पाऊलसुद्धां ढचलवत नाहीं. म्हणून तसाच उपाशीपोटीं निघालों होतों.

आतांशा माझा मित्र राहातो दादरला, आणि मी राहातों गिरगांवांत. आमच्या घरापासून चर्नीरोड स्टेशन कांहीं फारसें दूर नाहीं. दहा-बारा

मिनिटांचा रस्ता आहे. पण मला चालायला लागतो अर्धा तास. एके काळीं झपाझप पावलें टाकून सपासप रस्ता कापीत जाणारा मी, आतां मला आधारासाठीं हातांत काठी नाहीं तर छत्री घ्यावी लागते. आणि तरीसुद्धां मी अगदीं सावकाश, मंद गतीनें, अडखळत चालत असतों. समोरून येणाऱ्या वाहनांची, बाजूनें चालणाऱ्या लोकांची अडगळ वाटून मला त्यांचा अगदीं राग येतो. हातांतल्या काठीच्या एका फटकाऱ्यानें हा सारा गजबजाट मोडून टाकून मोकळ्या रस्त्यानें जायला मिळावें असा वेडा विचार माझ्या मनांत अलीकडे कितीदां तरी येत असतो. पण आत्तां, या वेळीं मात्र रस्त्यावर फारशीं माणसें नव्हतीं. रहदारी मंदावली होती. आणि तरीसुद्धां मी छत्रीच्या आधारानेंच चाललों होतों. म्हातारपण म्हणजे निम्में बाळपण म्हणतात, त्याचा अनुभव घेत होतों. लहाणपणीं पांगुळगाडा धरला असेल तर आतां छत्री घेतों, एवढेंच. लहान मूल जसें समोर पाहातें आणि तिरकें तिरकें हेलपाटत चालतें, तसेंच माझें चाललें होतें. मधून मधून माझे झोक जात होते, आणि उन्हाचा तडाखा मला सहन होत नव्हता. वाटत होतें कीं, माथ्यावर बर्फाची पिशवी ठेवावी. पाऊल लौकर उचलत नव्हतें, आणि स्टेशनचें अंतर किती शिल्लक आहे याचा मी हिशेब करीत होतों. आणि त्या हिशेब करण्याचाच मला त्रास होऊं लागला. एकाएकीं माझ्या डाव्या बाजूच्या खालच्या दाढेंतून लहानशी कळ आली. लहान असो कीं मोठी असो, माझा हात चटकन् गालाकडे गेला. उजव्या हातांत छत्री, डावा हात दाढेला, कुरवाळण्यांत गुंतलेला, पायाखालीं आणि डोक्यावर जणूं गरम पाण्याच्या पिशव्या ठेविलेल्या . . . मला किती निराधार आणि अधांतरीं वाटत होतें, तें माझें मलाच माहीत. पांच हजार रुपयांचें आमिष नसतें तर मी जीव द्यायला या वेळीं कधींच बाहेर पडलों नसतों. पण पैसा माणसाच्या हातून काय काय घडवीत असतो तें पाहा !

दाढ दाबून धरीत मीं सहज माझ्या या कृश झालेल्या देहाकडे पाहिलें आणि मनांत आलें कीं, आपण किती बदलून गेलों आहोंत ! चाळीस वर्षांपूर्वी आपण तरुण होतों ह्याची साक्ष पटविणारी कोणतीच खूण आपल्या देहावर राहिलेली नाहीं. तरुण माणसाला जसें आपण मूल होतों हें खरें वाटत नाहीं,तसेंच मला आपण तरुण होतों हें खरेंच वाटेना. किती तरी वर्षे म्हातारे होऊन या जगांत आपण रखडतों आहोंत असें वाटूं लागलें. मला शक्ति होती, उत्साहानें मी भरून वाहात होतों. हें सारें मागच्या स्टेशनासारखें मागें पडलें आणि पुढच्या स्टेशनावर येईपर्यंत आतां आपण अगदीं थकून गेलों आहोंत ... तुम्हांला खोटें वाटेल, पण म्हातारा माणूस नेहमीं आपल्या म्हातारपणाचा, आपल्या दुखण्याचा, आपल्या अडचणींचा आणि आपल्या त्रस्त मनःस्थितीचाच विचार करीत असतो. म्हणून तर तो किरकिरा होतो. निदान माझें तरी हें असें झालें आहे. मधून मधून त्या काळाचें दर्शन झाल्यासारखें वाटतें आणि मृत्यूच्या कल्पनेनें माझा जीव अगदीं कासावीस होऊन जातो..

भट्टींत लोखंड तापून निघावें तशी उन्हांत दुपार तापून निघाली होती. परमेश्वराचे जे अनेक उपद्व्याप आहेत त्यांतला हा एक आहे. दुपारच्या वेळीं तो लोहार होतो आणि सारी वस्तुजात आपल्या भट्टींत भाजून काढतो. तलवारीच्या धारेसारखें उन्हाचें तेज तळपत होतें. माथ्यावरून सूर्य आणि पायाखालून डांबरी रस्ता आगीचा वर्षाव करीत होते. माझ्या अंगांतून घामाच्या धारा निथळत होत्या आणि अंगावरचे कपडे चिंब होत होते. रस्त्यावर माणसें अगदींच तुरळक होतीं. क्वचित् एखादी गाडी ओढीत नेणाऱ्या घोड्याच्या टापा ऐकूं येत होत्या. बाकी वारासुद्धां वाहायचा थांबला होता. झाडें अगदीं स्तब्ध उभीं होतीं. रस्त्यावरचीं घरें संत्रस्त झाल्यासारखीं दिसत होतीं. आकाश अगदीं स्वच्छ होतें. पण प्रखर उन्हानें साऱ्या वाता-

वरणाला एक प्रकारचा भणभणीतपणा आला होता. सारें कसें तेजस्वी असूनहि रखरखीत, कोरडें, जीवनहीन वाटत होतें.

मी फुटपाथवरून चाललों होतों, तों माझ्या डाव्या हाताकडून एक पांगळा ढुंगणानेंच सरसर पुढें सरकून माझ्यापर्यंत आला आणि आपल्या काळघा-मिट्ट झालेल्या पोटावर थापटचा मारीत भीक मागूं लागला. तें कुरूप दारिद्र्य घट्ट मनानें दृष्टीआड करून चारसहा पावलें पुढें गेलों, तों हातांपायांची बोटें झडून गेलेला, ठिकठिकाणीं सूज येऊन महारोगाच्या जखमा झालेला, ओंठ फाटून हिरडया बाहेर पडलेला आणि नाकाचीं फक्त तीं दोन ओंगळ भोंकेंच असलेला तो महारोगी.. त्याच्या डोळ्यांतले अश्रू गालांवरून ओघळत होते आणि भिकेसाठीं तो आपले चिंध्या बांधलेले हात पुन्हा पुन्हा कपाळा-पाशीं नेत होता. त्याची ती अवस्था पाहून जीव किती आक्रसून गेला, सांगतां येत नाहीं. माझ्याहि दाढेंतून कळ आली आणि मला वाटलें, याला कांहीं दिलें पाहिजे. पण माझ्यामागून येणाऱ्या माणसानें त्याच्या पुढ्यांत कसलें तरी नाणें टाकिलें आणि मीं एकदम त्या दानधर्मांतून अंग काढून घेतलें. जसा कांहीं तो मागून येणारा दाता माझा मुनीमच होता ! पण आकाशच फाटलें तिथें आपण किती ठिगळें लावणार ?

मात्र त्या पांढऱ्या फटफटीत आकाशाकडे पाहातां पाहातां मनांत आलें कीं, या प्रकाशापलीकडे जिथें अंधार आहे तिथें यमाचा तो दूत काळे कपडे घालून, जाड दोरखंडाचा गळफांस घेऊन, किंचित् वांकलेल्या पाठीनें पण रोंखलेल्या नजरेनें आपल्याकडे पाहातो आहे ! तो यमदूतहि मला म्हाता-राच झालेला वाटत होता. असें कां वाटलें कोण जाणे ! कदाचित् जीव घेऊन जाण्याचें काम ज्यानें युगानुयुगें अव्याहत केलें त्याचें रूप मला तरुणें कसें दिसावें ? मृत्यूवरून जन्माला येण्याची आठवण झाली. माणूस जन्माला

यतो म्हणजे अंधारांतून प्रकाशांत येतो; आणि मृत्यु त्याच्या जवळ येऊं लागतो तसतसा तो मग प्रकाशांतून पुन्हा अंधाराकडे सरकूं लागतो. आधीं अंधार कीं प्रकाश ? आणि प्रकाशांत आल्यावर पुन्हा अंधार कां ? कीं मृत्यूपासूनच जीवनाला सुरुवात होते ? ज्याला आपण जीवन समजतों तें एक स्वप्नच आहे काय ?..

असें काहीं मनांत चालू आहे, मी रणरणलेल्या उन्हांतून छत्रीचें संरक्षण घेऊन, भर दुपारीं बारा वाजतां माझ्या मंद गतीनें चाललों आहें, आतां रस्ता ओलांडण्याच्या बेतांत आहें, तों पलीकडच्या रस्त्यावरून गाण्याचे गोड सूर माझ्या कानांवर आले. अशा या तप्त वेळीं गाण्याचे गोड स्वर ऐकूं येणें म्हणजे जलदांतून ओघळलेल्या शीतल जलधाराच जणूं ! क्षणभर माझ्या डोळ्यांसमोर चमकणारे उन्हाचे काजवे अंतर्धान पावले. मी जागच्या जागींच थबकलों. माझ्या तरुणपणाची कोणती खूण अजून शिल्लक असेल तर ती हीच कीं, गोड गायनावर मी अजून लुब्ध होतों. हाताचा पंजा डोळ्यांवर धरून मी समोरच्या रस्त्याकडे निरखून पाहूं लागलों, तों चाळीस एक वर्षांची एक प्रौढ स्त्री, जिच्या केसांचा जटाभार झाला आहे, देहाची लाज जिनें लक्तऱ्या नेसून भागविली आहे, जिच्या काळ्याकभिन्न मळक्या अंगावरून घामाच्या धारा वाहात आहेत आणि जिनें हातांत भिक्षेसाठीं परळी धरलेली आहे, अशी एक भिकारीण आपल्या सुरेल आवाजांत गात होती, ' पल पल जलता है शमशान.. ' ती एकेक पाऊल पुढें पुढें टाकीत होती आणि कोणी दाता भेटतो कीं काय हें पाहण्यासाठीं मधूनच थबकत होती. परळींत टाकिलेल्या पैशा–दोन पैशाचा आवाज जणूं तिच्या गाण्याची साथ करीत होता. ज्या गळ्यांत एवढा गोड आवाज भरून राहिला होता, त्या देहाची जेवढी विटंबना होणें शक्य होतें तेवढी

झालेली दिसत होती. कारण तिचा आवाज जरी गोड होता तरी त्यांतहि अशीं कांहीं 'दर्दभरी' आर्तता होती कीं माझें अंतःकरण अगदीं फाटून गेलें. तिची विव्हळ आर्तता मला बेचैन करूं लागली. मी लक्ष लावून ऐकूं लागलों कीं ही काय गाते आहे ? खरोखरीच कोणी दुःखी कष्टी जीव तळमळून गात होता :

"पल पल जलता है शमशान ।
हँसकर जलती रोज चिताएँ ।
हराभरा संसार जलाये
मिटती कितनोंकीं आशाएँ ।
मन होता सुनसान ।।
भाई, पल पल जलता है शमशान ।"

तें आक्कण कडवें घोळून घोळून म्हणावें आणि क्षणभर थांबून आपली परळी वाजवावी असें तिचें चाललें होतें. हा वेळपर्यंत मी रस्ता ओलांडून तिच्या फुटपाथवर आलों होतों. आणि आतां मी तिच्याच मागून चाललों होतों. स्टेशनाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या अगदीं विरुद्ध दिशेला मी चाललों होतों. मला हें माहीत होतें; आणि तरीहि मी चाललों होतों. कारण ती म्हणत होती कीं, 'क्षणाक्षणाला हें स्मशान जळत आहे.' माझीहि आहुति एक दिवस यांतच पडणार आहे, नव्हे काय ? मृत्यु या संस्थेची मला भीति वाटत असली तरी अलीकडे या विषयाचाच विचार करण्याकडे माझ्या मनाची ओढ खेंचूं लागली आहे. ती गात होती :

"दुल्हनने वर जलता पाया ।
मौत बडी बलवान् ।
भाई, पल पल जलता है शमशान ।।"

खरेंच ! कणाकणानें क्षणाक्षणानें आपण मरतों आहोंत. आपण इथून कधीं जाऊं याचा नेम नाहीं; पण जाणार हें मात्र नक्की आहे. तेव्हां मी यांतलें काय बरोबर नेईन ? आपल्या खिशांत पैसे असतांना या उपाशी भिकारिणीला आपण कांहींच देऊं नये हा केवढा स्वार्थीपणा आहे ! माझा जीवहि भुकेनें कळवळला होता. या स्त्रीला भुकेचे चटके कसे बसत असतील याची मला कल्पना येत होती. तिला कांहीं तरी देण्यासाठीं म्हणून मीं कोटाच्या खिशांत हात घातला. मी खिशांत हात घालायला आणि भिकारिणीनें माझ्याकडे वळून पाहायला एकच गांठ पडली. मी तिला कांहीं तरी देणार आहे, हें तिच्या ध्यानांत आलें. ती थबकली. आशाळभूत नजरेनें पाहूं लागली. आणि पैशासाठीं खिशांत घातलेल्या माझ्या हाताला कळून आलें कीं, कपाटाच्या किल्ल्या माझ्या खिशांत नव्हत्या. मी एकदम चमकलों. पैसे काढण्याचा विचार आपोआपच बाजूला सरकला आणि मला माझ्या किल्ल्यांचाच धसका बसला ! कपाट उघडलें, कोट काढून घेतला, पुन्हां कपाट बंद केलें, हें सारें मला स्पष्टपणें आठवीत होतें. आणि मग मीं किल्ल्या कोठें ठेविल्या ? कपाटांत ठेविलेल्या जिनसा अशाच मौल्यवान् होत्या कीं, त्याच्या किल्ल्या अगदीं बंदोबस्तानें ठेवणेंच जरूर होतें; कोठें तरी पडून चालण्यासारखें नव्हतें. आणि इतक्या महत्त्वाच्या किल्ल्याच मीं कोठें ठेविल्या मला आठवेना. कोटाचे सारे खिसे मीं पुन्हां पुन्हां तपासिले. आणि अखेर मीं रस्त्यावरहि थोडें न्याहाळून पाहूं लागलों. तरीहि माझें भिकारिणीकडे लक्ष होतेंच. तिला वाटलें कीं, हा म्हातारा आपल्याला कांहीं तरी देणार होता हें खरें नाहीं. याचेंच कांहीं हरविलें आहे आणि तें तो शोधीत आहे. आपलें तें गाणें 'पल पल जलता है शमशान ' म्हणत ती पुन्हां एकेक पाऊल पुढें टाकूं लागली. स्मशानाच्या या गाण्यानेंच मला पुन्हा सावध केलें. किल्ल्यांचा विचार

तूर्त बाजूला सारून मीं पैशांचें पाकीट बाहेर काढिलें आणि तिच्यामागून चालूं लागलों. तिच्या–माझ्यांत अंतर होतें, तरी पण तिनें एकदां मागें वळून पाहिलें आणि माझ्या हातांत पैशांचें पाकीट दिसतांच ती आशेनें थबकली. पण तिचें नशीब असें कीं, माझ्या पाकिटांत मोड नव्हती. पांचाच्या, दहाच्या नोटा होत्या आणि सबंध एक रुपया होता. तिला कांहीं आणा–दोन आणे द्यावे अशी माझी इच्छा होती. पण सबंध रुपया द्यायला माझा जीव धजत नव्हता. रस्त्यावरून कोणी माणूस चालला होता त्याला थांबवून मीं विचारिलें, " आपल्याजवळ रुपयाची मोड आहे का ?"

त्यानें आपला खिसा चांचपला आणि तो म्हणाला, " नाहीं."

रस्त्यावर फारशी रहदारी नव्हतीच. विचार करीत दुसऱ्या एखाद्या माणसाची वाट पाहात मी चाललों होतों. भिकारीण माझ्याकडे पाहात थांबली होती. पण मीं तिच्याकडे अशा प्रकारें पाहिलें किंवा दुर्लक्ष केलें कीं, माझ्या मनांत तिला कांहीं द्यावयाचें आहे किंवा नाहीं याबद्दल तिच्या मनांत संदेह निर्माण व्हावा. कारण मोड मिळणार नसली तर सबंध रुपया मी कांहीं तिला देणार नव्हतों. त्यामुळें तीहि अशा पद्धतीनें थांबत होती अगर चालत होती कीं, ती माझ्यासाठीं थांबलीहि नव्हती कीं माझ्या मर्यादेपलीकडे गेली नव्हती. तिच्याजवळ कदाचित् मला मोड मिळाली असती. पण तिच्या जवळचे पैसे मोड म्हणून आपण घ्यावेत हें मला बरें वाटत नव्हतें.

एवढ्यांत दुसरा एक माणूस आला. त्याला थांबवून मीं विचारिलें, " मोड आहे का हो तुमच्याजवळ ? "

" हो." असें म्हणून त्यानें आपलें पाकीट बाहेर काढिलें. पण मीं रुपया पुढें करितांच तो म्हणाला, " माझ्याजवळ बाराच आणे आहेत; सोळा नाहींत."

अर्थात् हा सौदा मला परवडण्यासारखा नव्हता. भिकारिणीला दोन आणे देण्यासाठीं मोड घेतांना चार आण्यांचा तोटा सोसायला मी तयार नव्हतों. पण मग करावें काय ?

आणखी तिसऱ्या वाटसरूची वाट पाहाणें भाग होतें. मनांत येत होतें कीं, दादरला जायचें सोडून आपण उपाशी पोटीं या उन्हाच्या वेळीं या भिकारिणीच्या मागून चालण्याचा वेडेपणा काय करीत आहोंत ? पण तिचें तें गाणें— ' मौत बडी बलवान । भाई, पल पल जलता है शमशान ॥ '' तें गाणें माझ्या मनावर अंमल चालवीत होतें. तें गाणें मला तिच्या मागोमाग खेंचून नेत होतें. एवढा ओढला जात होतों तरी रुपया देण्याबाबतचा माझा कांटेतोल विचार कांहीं सुटत नव्हता. मला मोड हवी होती. रुपयाचे सोळा आणे देणारा कोणी मुशाफीर हवा होता. तों तिसरा मुशाफीर भेटला. त्यालाहि मीं तोच प्रश्न केला.

हात हलवीत तो म्हणाला, " माझ्याजवळ मोड नाहीं. पण तुम्हाला एखाद्या दुकानांत मिळेल. "

इकडे तिकडे पाहत मी म्हणालों, " दुकानं तर सारीं बंद आहेत."

कोपऱ्यावरच्या एका ' हेअर कटिंग सलून ' च्या दुकानाकडे बोट दाखवीत तो म्हणाला, " तें सुभाषचंद्र हेअर कटिंग सलून आहे ना, तें चोवीस तास उघडं असतं. तिथें तुम्हांला मोड मिळेल.''

आणि तो निघून गेला. माणसानें युक्ति तर चांगली सुचविली असें वाटून आणि मोड मिळण्याची खात्री दिसली म्हणून मीं त्या भिकारिणीला हात करून जवळ बोलाविलें आणि तिला घेऊनच त्या दुकानांत गेलों. रुपयाची मोड घेतली आणि दोन आणे तिला देऊन मी चर्नी रोड स्टेशनच्या रस्त्याला लागलों.

चर्नी रोडहून दादरच्या गाडींत बसायचें म्हणजे पूल ओलांडून पलीकडे जावें लागतें. हा पूल ओलांडण्याचें आणि तिकिट काढण्याचें दिव्य मीं कसें-बसें पार पाडलें आणि गाडीची वाट पाहात एका बांकावर टेंकलों. आणखी दोन तीन मिनिटांनींच गाडी आली. दुपारची वेळ होती म्हणून गाडीला विशेष गर्दी नव्हती. धक्काबुक्की न करितां मला खिडकीजवळची जागा मिळाली. छत्री पुढें धरून जरा सांवरून बसतों, हातरुमालानें तोंड पुसतों, किल्ल्या कोठें ठेविल्या असतील याचा विचार करतों, तोंच धक्का बसून गाडी सुरू झालीसुद्धां! मनांत आलें कीं, साहेबाचें डोकें मोठें हुषार, यांत कांहीं शंका नाहीं. हृचा आगगाडीचा शोध जर त्यानें लाविला नसता तर पैसे घ्यायला या भर उन्हाचा मी दादरला अवघ्या तीन आण्यांत कसा जाऊं शकलों असतों? शाबास आहे त्या इंग्रजाची! आमचें 'हें नको, तें नको'चें अध्यात्मशास्त्र किती कां पुढें जाईना, प्रत्येक गोष्ट 'नको' म्हणण्यांतच तें पुढें जायचें. पण या साहेबांनीं सारें जग आपल्या अद्‌भूत किमयेनें पार बदलून टाकिलें आहे! जें स्वप्नांतच दिसावें, जें कल्पनेंतच भरकटत राहावें, असलें अचाट तर्कट त्यांनीं प्रत्यक्षांतच आणून सोडिलें आहे. मोटार काय, आगगाडी काय, टेलिव्हिजन काय, रेडिओ काय आणि आतां तर मुळीं 'टयूब बेबीज्'... अचाट डोक्याचे हे एकेक प्रयोग पाहून आपली मति तर खरोखरी हतबुद्धच होऊन जाते... असल्या विचारांत गुंग असतांनाच मीं उजवा हात आरामशीरपणें खिडकीच्या कठ-

डब्यावर ठेविला आणि बाहेर पाहूं लागलों. तों गाडीला एकदम केवढा तरी गचका बसला आणि गाडी आस्ते–आस्ते वेग कमी होऊन थांबली. काय झालें तें पाहाण्यासाठीं प्रत्येकाची धडपड सुरू झाली. तरुण आणि लहान मुलें होतीं त्यांनीं धडाधड गाडीबाहेर उड्या टाकिल्या. आम्हीं कांहीं म्हातारीं माणसें आणि डब्यांतल्या इतर बायका मात्र खिडकीच्या तोंडाशीं गर्दी करूं लागलों. पण खिडक्यांना आडवे गज होते. त्यामुळें आमचे चेहेरे आम्हांला गाडीच्या बाहेर काढतां येत नव्हते. पोपटासारख्या वांकड्या तिकड्या माना करून, शरीराला बांक आणून आम्ही दिसेल तेवढें पाहात होतों. त्यांत पुन्हा कोणाजवळ पिशवी, कोणाजवळ छत्री, कोणाच्या खिशांत पैशाचीं पाकिटें असें कांहीं ना कांहीं असल्यामुळें अशा गर्दीच्या आणि घाईच्या वेळीं कोण, कसा, केव्हां काय लांबवील याची प्रत्येकाच्या मनांत धागधुग होतीच. त्यामुळें अर्धा जीव आपल्या धनदौलतींत गाडीच्या आंत लटकत असलेला, आणि अर्धा बाहेर काय घडलें आहे तें पाहाण्यासाठीं लोंबत–असे आम्ही धड बसलों नव्हतों कीं उभे नव्हतों. एकमेकांना ' काय झालें ' म्हणून विचारीत होतों. बाहेर आमच्या पलीकडच्या डब्याशेजारीं ही गर्दी झाली होती ! त्यांतल्या एकाला हांक मारून मीं विचारिलें. तेव्हां समजलें कीं, कोणी माणूस गाडीखालीं चेंगरून मेला आहे. कोणी मेला आहे, म्हणतांच माझा जीव उडून गेला. अंगावर त्या उन्हाच्या वेळींसुद्धां तरारून कांटा उभा राहिला. अरेरे ! कोण बिचारा गेला असेल ? आणि असा कसा मेला ? बरोबर ! तो माझ्यासारखाच म्हातारा असल्यामुळें त्याचे पाय दुखत असतील, पूल ओलांडायची दगदग होत नसेल, तेव्हां निघाला रुळावरून आणि आला बिचारा गाडीखालीं ... दुसरें काय ? च् च् ! बायका तर केव्हांपासून चुकचुकत होत्या. खालीं उभीं असलेलीं तरणीं मुलें मात्र हंसत होतीं. लग्नाची वरात ज्या उत्सुकतेनें पाहावी त्याच उत्सुकतेनें तीं त्याची शेवटची यात्रा पाहात होतीं.

त्याचा तो पार्थिव देह अजून गाडीच्या चाकाखालींच होता. त्या पिंजऱ्यांतला जीव तर कैव्हांच उडून गेला होता. तो जीव जोंपर्यंत त्या देहांत होता, म्हणजे तो गाडीखालचा अचेतन देह जेव्हां सचेतन होता, आतांचें तें निर्जीव शरीर जेव्हां सजीव होतें, त्या वेळीं जेवढी सहानुभूति त्याला लाभली नसेल तेवढी सहानुभूति आणि हळहळ त्या उडून गेलेल्या जिवाबद्दल आज किती तरी जिवांना वाटत होती. जिवंतपणीं ज्याच्याकडे कोणीं ढुंकूनसुद्धां पाहिलें नसतें, तो मेल्यावर त्याला पाहायला केवढी गर्दी झाली होती! मनांत आलें कीं, मृत्यूसारखी नित्य घडणारी गोष्ट; पण आम्हां मर्त्य जिवांच्या परिचयाची होत नाहीं. वास्तविक जगणें हाच अपघात आहे. त्यांतून म्हातारपणापर्यंत जगणें हा एक चमत्कारच आहे. . . . पण या चमत्काराकडे कोणी पाहात नाहीं आणि मरणासारख्या साध्या गोष्टीकडे आम्ही केवढ्या आश्चर्यानें पाहतों! आम्हाला नुसतें पिंजऱ्याचेंच कौतुक वाटतें; पोपटाचें मात्र कांहींच वाटत नाहीं. ज्यानें आगगाड्यांसारखे कौतुकास्पद शोध लाविले त्याच जातीच्या माणसांना आगगाडींत बसलेल्या माणसांचें कौतुक वाटत नाहीं; आगगाडीखालीं येणाऱ्यांचें वाटतें. . . . आणि ज्या गाडीनें सृष्टीवर विजय मिळविला असें आपण मघां म्हणत होतों तिच्याहि पलीकडची शक्ति एका माणसाच्या जिवावर सहज हल्ला करून बसली होती . . .

गाडी पुन्हा किंचित् हलली आणि पुन्हा थांबली. रेल्वे–अधिकाऱ्यांची धांवपळ चालली होती. गाडीच्या चाकाखालीं आलेला तो माणूस सोडवून घेत दोघांचौघांनीं त्याला बाहेर काढिलें. मी आतां गाडीच्या दाराशींच येऊन उभा राहिलों होतों. त्याला पाहाण्याची माझी उत्सुकता तरी मला कोठें स्वस्थ बसूं देत होती? पण जें दृश्य मीं पाहिलें, तें इतकें भयानक होतें कीं मला आणखी त्याच्याकडे पाहावेना. माझे पायच लटपटूं लागले. घशांत कांहीं

अडकून आलें. त्याच्या चेहऱ्याची दामटी वळली होती. त्यावरून रक्ताचे ओघळ गेले होते. त्याचा एक हात आणि एक पाय अजिबात कोठें तुटून पडला होता. ते तुकडे अजून कोणाला सांपडले नव्हते. त्याच्या अंगावरचे कपडेहि फाटले होते. तें दृश्य पाहाण्यासारखें नव्हतें. वाटलें कीं, क्षणापूर्वी चालणारा–बोलणारा देह आतां कायमचा झोंपीं गेला! म्हणजे चालणें-बोलणें हें सारें खोटें आणि आतांची ही त्याची झोंप मात्र खरी. काय जीवन आहे माणसाचें! क्षणांत दुनिया बदलून जाते. दुनिया बदलते कीं जीवन बदलतें? हा असा एका क्षणाचा तडकाफडकी आलेला मृत्यु पाहिला कीं वाटतें जिंदगी क्षणाची आहे. बाकी सारा संसार, सारें जीवन ' पल पल जलता है शमशान....'

मला मघांच्या भिकारिणीची आठवण झाली. वाटलें कीं, सारें झूट आहे. आणि मी उपाशीं पोटीं पैसे मागायला निघालों आहें. माझ्या शेजारीं बसलेले दोन वृद्ध गृहस्थ एकमेकांना सांगूं लागले, " अहो, कसलीं माणसं आपण ! सारा जन्म भांडणांत काढतों. हें तुझं, हें माझं, हें मीं केलं, हें माझं. कर्तव्य, ही माझी दौलत, हा माझा संसार . . .सारं माझं...माझं...माझं...! पण तो जो न्यायला आलेला असतो त्याची आपल्याला आठवणच नसते. आणि तो आला कीं मग उशीर लावून चालत नाहीं. त्याला थांबायलाच वेळ नसतो. अहंकारांत लडबडून ठेविलेला हा संसार सारा इथेंच, असाच्या असाच टाकून एक दिवस आपण त्या यमाचें बोट धरून चालूं लागतों. तिथें मग 'मी'पणा गुंडाळला जातो. कारण तो न्यायला आलेला आपल्या 'मी' पणाची चौकशीसुद्धां करीत नाहीं. आणि आपण हा अहंकार धरून आपल्या मुलांबाळांशीं, सग्यासोयऱ्यांशीं उगाच किती भांडत असतों. मी तर बाबा आतां विरोध करायचाच सोडून देणार आहें! "

मला आपलें तें त्यांचें बोलणें पटत होतें. खरेंच, मघांचा अपघात मीं पाहिला म्हणजे मृत्यु माझ्या अगदीं शेजारूनच गेलेला पाहिला होता. जातां जातां डोळ्यांच्या एका कोपऱ्यांतून त्यानें माझ्याकडे पाहिलें नसेल कशावरून? . . . .

० ० ०

दादर स्टेशनावर मी हलकेंच उतरलों. मला सारखा तो अपघातच दिसत होता. पोटांत भुकेनें कलकलत होतें. आणि मघांच्या त्या दृश्यानें जीव आणखीच हलका झाला होता. मृत्यूच्या त्या भयानक दर्शनानें मी भारावल्यासारखा झालों होतों. आपलें इथलें वास्तव्य संपत आल्याची आणि त्या अज्ञात गांवाची शींव जवळ येऊं लागल्याची एक कडवट जाणीव मला बेचैन करूं लागली. गाडी करून मी माझ्या मित्राच्या घरीं गेलों. मीं विचारिलें, " सदाशिवराव आहेत का ? "

तो झटकन् आंतल्या खोलींत गेल्याचा भास, दारांत पाऊल टाकतेवेळींच मला झाला. त्याची म्हातारी बायको पुढें येऊन म्हणाली, " तासापूर्वींच ते तुमच्याकडे जातों म्हणून गेले आहेत. तुमची नि त्यांची चुकामूक झाली वाटतं ? "

मनांत मी हंसलों. कांहींसा खिन्नहि झालों. माझा पैसा त्या बाईला खोटें बोलायला लावीत होता आणि माझ्या मित्राला तोंड लपवायला शिकवीत होता. मनांतले हे विचार क्षणांत बाजूला सारून मी म्हणालों, " हो. माझी आणि त्यांची कांहीं गांठ पडली नाहीं. पण कांहीं हरकत नाहीं. हें पहा, मला जरा दौत, टांक आणि कागद द्या. "

गुणगुणलें । गीत माझिया हृदयीं ठसलें.' पण मला पुढल्या ओळी येत नव्हत्या. त्या माहीत व्हाव्यात अशी माझी इच्छा होती, आणि एवढचा या दोनच ओळी मला आतां म्हणायच्या नव्हत्या. पण त्यासाठीं मला दुसरें कांहीं तरी घोळायला हवें होतें. तें मिळेपर्यंत हें सुटणार नव्हतें. रस्त्यानें मी पाटचा वाचीत चाललें होतें. पाटचा वाचीत जाण्याचा मला नाद आहे. अर्थ न कळतांसुद्धां मी वाचीत जातें. एका किराणा मालाच्या दुकानावर लिहिलें होतें : 'जुने डबे मूळ किंमतीला घेऊं. 'अर्थ कांहीं मी पाहिला नाहीं. आणि किती तरी वेळ मी स्वतःशीं म्हणत होतें, 'मूळ डबे जुन्या किंमतीला घेऊं.' माझें मलाच हसूं आलें. बाकी शब्द बदलला तरी अर्थ बदलत नव्हता. तेव्हां असें म्हणायला हरकत असूं नये. पण मला आतां 'कुणी बाई गुणगुणलें'– च्या पुढली ओळ हवी होती. आणि त्यासाठीं मी पुन्हा 'कुणी बाई' म्हणूं लागलें. चाल किती छान होती त्याची !

गाणें म्हणत चाललें होतें तोंच एका वाडयाच्या बाहेर कोणाच्या तरी प्रेतयात्रेची तयारी चाललेली दिसली. मनांत एकदम चर्रर झालें. माझें गाणें एकदम थांबलें. मृत्यु म्हटला कीं माझ्यासमोर एकदम अंधारानें भरलेली, कधींहि अंत न लागणारी, लांबच लांब, खोलच खोल विहीर दिसूं लागते. त्या विहीरींत आतां तो जाणार होता. आपणहि एक दिवस याच विहिरींतून......पण आज कोण गेला बरें ? पण पांच दहा पावलें मी गेलें नाहीं तोंच मी पुन्हां गुणगुणूं लागलें, 'कुणी बाई गुणगुणलें.' माझ्या डोळयांसमोर दिवेकरांची मूर्ति येऊं लागली. आज माझ्या मनांत काय काय येईल हें माझ्या हातांत राहिलें नव्हतें. त्यांची आठवण येण्याचें कांहींच कारण नव्हतें. माझें कांहीं त्यांच्यावर प्रेम नव्हतें. कोणावरहि चार-पांच वर्षें तरी प्रेम करायचें नाहीं असें मीं ठरविलें होतें. मला मुळीं एवढयांत लग्नच करायचें नव्हतें. इतक्या लौकर मी लग्न कशी करणार ?

लौकर म्हणजे कांहीं मी लहान नव्हतें. मॅट्रिक झाल्याबरोबर बाबा गेले आणि मी लगेच नोकरीला लागलें. त्याला आतां सात वर्षें झालीं. पण मीं हें कोसळणारें घर सांवरून धरलें नाहीं तोंच माझी सावत्र बहीण वारली. तिची एक वेडी मुलगी, नऊ वर्षांची कमळी, तिनें माझ्या आईच्या ओटींत घातली. तेव्हांपासून ती, माझ्या दोन बहिणी, दोन भाऊ आणि आई इतक्या माणसांचा प्रपंच मी चालवितें आहें, भावंडांचीं शिक्षणें, वेड्या मुलीच्या औषधाचीं बिलें—तिला सारख्या फिटस् येत असतात,— आणि आमचा सगळा खर्च, हें सारें माझ्या पगारांत चाले. मीं जर लग्न केलें तर या साऱ्यांचें काय होणार ? माझ्या सोन्यासारख्या आईनें काय हातांत पोळपाट–लाटणें घ्यायचें ? मग मी शिकलें कशाला ? सर्वांत मोठी झालें कशाला ? मी आपलें माझ्या धाकट्या बहिणीचेंच लग्न करून दिलें. मला नाहीं तर निदान तिला तरी संसारसुख मिळावें असें मला वाटलें. पण लग्न करून दिलें तरी तिचे सणवार करितां करितांच मला तीनचारशें रुपये कर्ज झालें.

झालें तर झालें ! फेडून टाकीन. पुढल्या वर्षीं मला पांच रुपये पगार वाढणार आहे. मी आपली ‘ कुणी बाई ’ची चाल गुणगुणूं लागलें. आज ऑफिसांत गेल्यावर मध्येंच केव्हां तरी मिस् पाळंदेला म्हणून दाखवायची.

माझ्याच विचारांत गर्क होऊन मी चाललें होतें. रस्त्यांतलें मला आज फारसें कोणी दिसत नव्हतें. रहदारीचा खडबडाट माझ्या कानावर-सुद्धां येत नव्हता. तोंच माझ्या हाताला धरून हालवीत एक दहा वर्षांचा मुलगा मला म्हणाला, “ बाई, उदबत्त्यांचा पुडा घ्या. एक तरी घ्या. आम्ही पांच आण्यांना घेतों, आणि तुम्हांला सहा आण्यांना विकतों. पांच आण्यांवर फक्त एक आणा मला मिळतो. पण बाई माझी फी····”

त्याचा चेहरा मला इतका आर्जवी, पण त्रस्त झालेला, काळवंडलेला दिसला कीं मला त्याची ती गयावया ऐकवेना. मला एकदम माझ्या वेड्या भाचीचाच चेहरा आठविला. पुष्कळ केंस असलेली, रुंद चेहऱ्याची, किडलेल्या दांतांची, फिट्स येऊन येऊन वेडी झालेली माझी भाची. आतां सोळा वर्षांची असूनहि ती नऊच वर्षांची दिसे. मला वाटलें, तीच माझ्यापुढें गयावया करते आहे. असें कां वाटलें कोण जाणे! ती तर वयाच्या मानानें लहान दिसते, आणि हा वयानें लहान असलेला कोंवळा मुलगा मोठ्या माणसांच्या काळज्या घेऊन गयावया करीत फिरत होता. त्याला शिकायचें होतें. फीसाठीं पैसे गोळा करायचे होते. घरीं अभ्यास खोळंबून बसला होता. पण त्याला आपलें दैन्य घेऊन.... तो मला पुन्हा सांगूं लागला. मी चट्‌दिशीं त्याला सहा आणे दिले. उदबत्तीचा पुडा घेतला. तो झट्‌कन् निघून गेला. दुसरें गिऱ्हाईक शोधण्यासाठीं गेला. अरेरे! मी त्याच्या पाठीवर थोपटणार होतें. त्याचा एक पुडा घेण्यानें त्याचें कांहीं झालें आहे असें मला वाटेना. पण मला अधिक कांहीं करितांहि येईना. म्हणून मी नुसतें त्याला थोपटणार होतें. त्याची गयावया ऐकून मीच केविलवाणी झालें कीं काय न कळे. पण तो झटकन् निघून गेला आणि मी रस्ता चालूं लागलें.

मला एकदम आठविलें. त्याच्या पायांत वाहाणा नव्हत्या. आमच्या-सुद्धां सर्वांच्या वाहाणा फाटल्या होत्या. पण आम्ही सर्वांनीं नुकत्याच वाहाणा करून घेतल्या होत्या. जरा जाडजूड, पण टिकाऊ, आणि कमी पैशांत मिळणाऱ्या. त्या सर्व वाहाणांचे पैसे मी पुढल्या महिन्यांत देणार होतें.

थोडी पुढें गेलें तों एका मुलीनें मला हटकलें. पातळ कागदांत बांधलेल्या लहान लहान चपट्या पुड्या माझ्यापुढें धरीत ती म्हणाली "बाई, आल्याच्या वड्या घेतां?"

"नको ग बाई !" मी म्हणालें. आल्याच्या वड्या घेऊन चैन करण्याएवढे पैसे माझ्याजवळ नव्हते. पण मी तिच्याकडे पाहिलें: परकर-पोलका घातलेली, चुणचुणीत चेहऱ्याची दहा-अकरा वर्षांची ती मुलगी होती. तिचा चेहरा पाहातांच मला वाटलें कीं ही मुलगी मोठी झाल्यावर चांगली गृहिणी होईल. ही आपला संसार मोठा आटोपशीर करील. नाजुक जिवणी, थोडेसे लहान, पण चमकणारे डोळे, कपाळाभोंवतालीं महिरप करणारे तिचे दाट मऊ केंस.... या मुलीनें आल्याच्या वड्या घेऊन रस्तोरस्तीं फिरावें? ही उद्यां गृहिणी होणार. हिनें लोकांच्या धक्काबुक्कींत शिरून रस्तोरस्तीं वड्या विकीत फिरावें? मला कसेंसेंच वाटलें. या वयाच्या मुली या वेळीं आईनें वाढलेला ऊन-ऊन स्वयंपाक जेवून शाळेंत जायच्या तयारींत असतात. मीं तिला विचारिलें, "या वड्या तूं कशासाठीं विकतेस?"

"शाळेची फी द्यायची आहे बाई. घेतां का? साबणचुरासुद्धां विकतों आम्ही– म्हणजे माझी आई. घ्याल तुम्ही? चौदा आणे पौंड, बारा आणे पौंड, दहा आणे पौंड, एक रुपया दोन आणेवालासुद्धां आहे बाई. घेतां?"

मला कांहींच नको होतें. पण ती म्हणाली, "शाळेची फी." तो मुलगासुद्धां तेंच म्हणाला होता. "शाळेची फी." विद्येसाठीं कोणी हात पसरूं लागला कीं माझ्या पोटांत कांहीं तरीच होतें. नाहीं म्हणवत नाहीं. मी म्हणालें, "साबण नको, पण वड्या केवढ्याला?"

"तीन आण्याला एक पुडी. किती देऊं!"

मी एकच पुडी घेतली. आणखी घेणें मला शक्य नव्हतें. वाहणांचे पैसे द्यायचे होते. मुलांना कपडे करायचे होते. मी एकच पुडी घ्यायची

म्हणून घेतली. एका पुडीनें कांहीं तिचें भागणार नव्हतें हें मला माहीत होतें; पण मला जास्त कांहीं करितां आलें नाहीं. वाटलें, कीं हिला शिकलें पाहिजे. माझ्यासारखाच हिचा बाप मरून गेला, तर ही आपल्या बापाचा संसार सांवरील. आईला भांडीं घांसायला नाहीं लावणार. ती झटकन निघून जाण्यापूर्वीच मीं तिच्या पाठीवर हात ठेविला. तो खरोखरीच तिच्या पाठीवर पडला. तिचा पोलका फाटला होता. त्या फाटक्या पोलक्यानें तिची पाठ उघडी केली होती. शिकून मोठी झाल्यावर ती धड पोलका घालणार होती. पण ही मुलगी मोठेपणीं नोकरीच करणार ? संसार नाहीं करणार ? छे ! हिनें गृहिणी व्हायला हवें. हिनें आपल्या राजाची राणी व्हावें असें रूप आहे हिचें. माझा हात पाठीवर पडतांच तिनें माझ्याकडे हंसून पाहिलें. किती सुंदर होते तिचे दांत ! तिला काय वाटलें कोण जाणे ! म्हणाली, “साबण घेणार का तुम्ही ?”

मला नको म्हणवेना; होय म्हणणें परवडेना. मी म्हणालें, “पुन्हा भेटलीस कीं घेईन.” पुन्हां एकदां ती हंसली आणि दुसऱ्या माणसाकडे वळली. या वयांत आपण काय करायला हवं याची तिला जाणीव नव्हती म्हणून ती हंसली. पण मी पाहात होतें. उद्यांची गृहिणी विचारीत होती, “आल्याच्या वड्या घेतां ? फक्त तीन आणे किंमत आहे याची. मला फी द्यायची आहे शाळेची.”

मी ऑफिसांत येऊन पोंचलें तरी ती मुलगी मला दिसत होती. माझें गाणें बंद पडलें होतें आणि मी सारखी म्हणत होतें,–‘आल्याच्या वड्या घेतां? मला शाळेची फी द्यायची आहे.’

सहज सगळीकडे पाहिलें. आज सबंध दिवस दिवेकरांची जागा रिकामीच होती. दिवेकर कां आले नाहींत बरें? मला उगीचच रिकामें रिकामें वाटलें.

संध्याकाळपर्यंत काम झालें आणि आंबलेल्या मनानें घरीं आलें. घरून जेवून निघालें तेव्हांची मन:स्थिति आणि आतांची.... अकारण वाटलेली प्रसन्नता अकारणच निघून गेली. उदबत्तीवाला मुलगा, वड्या विकणारी मुलगी आणि दिवेकरांची गैरहजेरी. सकाळीं पाहिलेली ती मृत्यूची विहीर आणि दिवसभर ऑफिसांत खर्डेघांशी. कांहीं तरीच दिवस गेला होता. दारांत पाऊल टाकिलें तों कुठें तरी रेडिओवर सनईचे सूर ऐकू आले. मला सनईचे सूर ऐकवत नाहींत. कांहीं तरी पिळून काढल्यासारखें वाटतें. गाण्यांतून कोणी तरी हुंदके देत आहे असें वाटतें. घरांत आल्याबरोबर मीं दार लावून टाकिलें.

घरांत आलें खरी, पण कमळी आली नाहीं. तिनें मला मिठी मारिली नाहीं. आपले हात माझ्या गळ्यांत घातले नाहींत. कमळी समोर भिंतीशीं निजलेली दिसली. तिच्या कपाळावर पाण्याची पट्टी ठेविलेली होती. तिच्या-जवळ जात, तिच्या अंगाला हात लावीत मीं विचारिलें,

"आई, कमळीला काय होतंय "

"आज फिट्स् येताहेत तिला." आई हात पुशीत पुढें आली. पुन्हा घरांत गेली. गरम गरम चहाचा कप माझ्यापुढें करीत ती म्हणाली, "घे. चेहरा कां असा दिसतोय तुझा ?" माझ्यासाठीं तिचा जीव थोडा थोडा होई. तिच्याच संसारासाठीं मला लग्न करितां येत नाहीं याची त्या प्रेमळ जिवाला मोठी खंत वाटे. घरांतलें कर्तें माणूस म्हणून ती मला जपे. मला घरांत कामाला हात लावूं देत नसे. माझ्या इतर भावंडांवर ती रागावे. त्यांना मधून मधून म्हणे, "इंदू आहे म्हणून तुम्ही जेवताय. छळूं नका तिला." मी तिला म्हणायची, "असं बोलूं नकोस आई." पण ती मला जपते याचें मला कुठें तरी सुखच होई. तिनें माझ्याकडे दुर्लक्ष केलें असतें तर तिचा मला रागच

आला असता. पण आपल्यासाठीं कोणी जीव टाकूं लागलें कीं आपली कृतज्ञता भरून येते. आपल्यासाठीं प्रेमानें हळहळावें असेंहि वाटतें, आणि हळहळूं नये असेंहि वाटतें. मी कमळीची चौकशी करीत होतें तरी ती मलाच विचारीत होती, 'तुझा चेहरा कां असा ?'

मी म्हणालें, "कसा आहे ? चांगली आहे मी. पण कमळीला किती फिट्स् आल्या ?"

"तूं ऑफिसांत गेल्यापासून पंधरा–वीस आल्या. ?"

"मग त्याला औषध ?"

"काय द्यायचं बरं इंदे ! तिचा बाप एक छदामसुद्धां देत नाहीं. आपण किती पैसे खर्च करायचे ?" आई उद्वेगानें म्हणाली. तिचें म्हणणें खरें होतें. कमळीचा तो जन्मदाता बाप तिची चौकशीसुद्धां करीत नव्हता, कीं ती जिवंत आहे कीं मेली. बोलतां बोलतां आईनें जवळचें भांडें जोरानें पुढें सरकवलें. जरा थांबून ती म्हणाली, "ऐकलंस इंदू, तुला सांगितलं नव्हतं, पण कमळीला हल्लीं रोज फिट्स् येतात. तुझ्या डोक्याला त्रास नको म्हणून नाहीं सांगितलं तुला. आज मात्र सारख्याच येताहेत. माझ्या मेलीचा जंजाळ तुझ्यामागें लागला आहे. म्हातारपणीं यांनीं लग्न केलं आणि मी बसलें नुसतीं पोरं घेऊन. हे गेले निघून आणि तूं आपली घाण्याला जुंपली आहेस. माझं दुर्दैव नसतं तर एव्हांना तुझं लग्न होऊन तूं सासरीं गेली असतीस. दोन मुलांची आई झाली असतीस."

आईचा गळा दाटून आला होता. मला एकदम त्या आल्याच्या वड्या विकणाऱ्या मुलीची आठवण झाली. गृहिणी होण्यासाठींच निर्माण झालेला

तिचा गोड चेहरा आठविला. तिच्याबद्दल जें मला वाटलें होतें तेंच माझ्या-बद्दल माझ्या आईला वाटत होतें. माझा चेहरासुद्धां गृहिणी होण्यासारखाच होता काय ? मला दिवेकरांची आठवण झाली. इंदुरी पातळ नेसलेली माझीच छबी मला दिसूं लागली आणि एकदम आमची वेडी, फिट्स्नीं आजारी असलेली कमळी . . . मी म्हटलें, "तूं उगीच त्रास करून घेतेस आई, मीं कधीं तक्रार केली आहे का ? कमळीला औषध आणलं पाहिजे. ती बरी होणार नसली आणि आपल्याजवळ पुरेसे पैसे नसले तरी कमळीला औषध आणलं पाहिजे. कमळी आपली आहे. तिच्या यातना आपण निदान कमी तरी केल्या पाहिजेत. आई, फिट् आली म्हणजे ती कसं करते तें माहीत आहे ना तुला ? मला त्या यातना बघवत नाहींत."

आई कांहींच बोलली नाहीं. कमळीला फिट्स् येऊं लागल्या कीं आमच्या त्या एवढ्याशा दोन खोल्यांच्या जागेला अवकळा आल्यासारखें होतें. आधींच आक्रसून गेलेला आनंद आणखीच आखडून येतो. गरीबा-घरचीं मुलेंसुद्धां अकाली गंभीर होतात. हातपाय आखडून माझे दोन धाकटे भाऊ हलक्या आवाजांत परवचा म्हणत होते.आणि यंदांच मॅट्रिकला आलेली बहीण पाटपाणी करीत होती. कमळी आजारी असतांना अभ्यास तरी कुठें करायचा हा प्रश्नच होता. तिला त्रास होईल म्हणून मोठ्यानें बोलायचेंसुद्धां नाहीं. सारें कसें अगदीं आंबून चिबून गेलें होतें. सारें कांहीं आखूड होऊन गेलें होतें. जीवनाची लांबी-रुंदी मुळीं कोणी तरी कापूनच टाकिली होती. मला एकदम वाटलें कीं आपले हे लांबसडक सुंदर केंस कोणी तरी कापून अगदीं आखूड करून टाकलेत. सगळें सौंदर्यच छाटून टाकिलें आहे. पण तरी-सुद्धां या साऱ्या आखूड गोष्टी गिळून टाकून मी कमळीच्या अंगावर हात ठेविला होता. मला ती वेडी, कुरूप, ठेंगू मुलगी माझ्या मुलीसारखीच वाटे. असें व्हायला त्या बिचारीनें कोणतें पाप केलें होतें ?

आई म्हणाली, " बरं, उद्यां आणूं औषध. आतां तिला जरा झोंप लागली आहे. तूं जेवायला चल."

मी उठलें. हात-पाय धुतले. पाहातें तों माझें एकटीचेंच पान मांडलेलें होतें. मीं खुंटीवरच्या जीर्ण झालेल्या टॉवेलला हात पुशीत म्हटलें, "आणि बाकीच्यांचीं पानें ?"

आई म्हणाली, "आज संध्याकाळीं सर्वांनीं भरपूर खाल्लंय् आणि मला आज उपास आहे. तूं बैस जेवायला."

आईनें माझ्या पानांत गरम गरम भात वाढला. तुपाची धार थोडी जास्त घातली. माझें मन कांहीं स्वस्थ नव्हतें. कुठेंच स्थिर नव्हतें. मी विचारहि करीत होतें, आणि करीत नव्हतेंहि. कारण कशाचा विचार करीत होतें हें माझें मलाच समजत नव्हतें. आपलें शरीर कधीं अंधांतरीं राहात नाहीं; पण मन कित्येकदां अधांतरीं असतें. माझ्या पानांत काय काय वाढलेलें आहे हें मला समजतसुद्धां नव्हतें. वस्तूंनीं एकादी पेटी भरावी तशी मी माझें पोट भरीत होतें. जीव अस्वस्थ असला कीं अन्नाला चव लागत नाहीं.

मी जेवीत होतें तोंच माझा धाकटा भाऊ सांगत आला, " आई, कमळीला फिट् आली. बघ ती कशी करते आहे. "

मी चटकन् पानावरून उठलें. मला घांसच गिळेना. आम्ही सगळीं कमळीच्या भोंवतीं जमलों. तिच्या हाताच्या मुठी वळल्या होत्या. पाय लांकडासारखे ताठ झाले होते. बैलाच्या तोंडांतून जिवापाड पळल्यावर जसा फेंस येतो तसा तिच्या तोंडांतून येत होता. आणि तोंड वांकडें होऊन तिचें डोकें सारखें अंथरुणावर आपटत होतें. त्या आपटण्याला एवढा जोर होता कीं आपण तें दाबून धरलें तरी तें हालतच राही. एवढ्या अशक्त

कमळीच्या अंगांत फिट् आल्यावर एवढा जोर कुठून येतो? डोक्याच्या प्रत्येक हाबक्याबरोबर कमळी केवढचानें तरी उचकी देत होती. मला तें ऐकवेना कीं पाहावेना. मी माझ्या भावाला म्हटलें, "राजा, आत्तांच्या आत्तां जाऊन डॉक्टरना घेऊन ये. म्हणावं, लगेच या."

आई म्हणाली, "सकाळीं आपणच घेऊन गेलों तर? म्हणजे डॉक्टरची व्हिजिट फी तरी नको द्यायला."

"नको आई, आपण फी देऊं. आपण सगळं बिल देऊं त्यांचं. जाऊं देत पैसे. पण तिचे हाल मला पाहावत नाहींत." वेडी असली तरी कमळी आमची होती. कमळी माझी होती. मी ऑफिसमधून आल्याबरोबर ती माझ्या कमरेला मिठी मारिते. एखाद्या कोंकरासारखी ती मला बिलगते. या घराची जबाबदारी माझ्यावर होती. कमळीची सारी जबाबदारी माझ्यावर होती. मला एकाएकीं मगाच्याच प्रेतयात्रेची आठवण झाली. मृत्यु म्हणजे एक भयंकर अंधारानें भरलेली विहीर माझ्यासमोर उभी राहिली. सकाळचा तो माणूस त्या विहिरींत गेला. आमची कमळीसुद्धां एक दिवस त्या विहिरींत . . . जाणार जाणार हें निश्चित. ती कधींच बरी व्हावयाची नाहीं. एक दिवस कमळी त्या विहिरींत उडी घेणार. जाणार. पण अशी नको. यातना असह्य होऊन नको. "कमळे–"

मी तिला हांका मारूं लागलें. आईनें तिच्या कपाळावर गार पाणी मारिलें. नाकाशीं कांदा धरिला. पण ती सावध होईना. एवढचांत डॉक्टर आले. आईनें त्यांना सारें सांगितलें. डॉक्टरांनीं तिला तपासिलें. गंभीर होत डॉक्टर म्हणाले, "फारच मोठी फिट् आली आहे हिला. ही नुसत्या औषधानें लवकर जायची नाहीं. हिला इंजेक्शन दिलें पाहिजे." डॉक्टर

आपल्या गळ्यांतल्या स्टेथॅस्कोपवर बोटानें आघात करीत होते. मी म्हणालें, " देऊन टाका मग. आत्तांच द्यायचं ना ? "

डॉक्टरांनीं सुई काढली. मीं मान फिरविली. मला इंजेक्शन दिलेलें पाहावत नाहीं. कमळीच्या बाबतींत तर माझा जीव फारच हळवा झालेला होता. तिला इंजेक्शन दिलें कीं माझ्याच दंडांत सुई भोंसकल्यासारखें मला वाटे. आतांपर्यंत किती इंजेक्शनें कमळीनें पचविलीं असतील त्याला गणतीच नव्हती.

इंजेक्शन देऊन डॉक्टर निघून गेले. थोड्या वेळानें कमळी शुद्धीवर आली. पहिल्यानें तिनें मलाच हांक मारिली : " ताई, कुठें गेली होतीस ? "

" कुठें नाहीं राजा. मी तुझ्याजवळच आहें. आतां बरं वाटतंय ना तुला ! " मीं तिच्या चेहऱ्याजवळ वांकून विचारिलें.

कमळी नुसती कण्हली. उठायला लागली. तिला माझ्या मांडीवर बसून मला कोंकरासारखें चिकटून बसायचें होतें. मीं तिला बसती केली आणि जवळ घेतली. तिनें माझ्या खांद्यावर मान ठेविली. मी तिच्या अंगावरून हात फिरवूं लागलें. किती तरी वेळ मी तशीच बसलें होतें. माझ्या वृत्तीला एक प्रकारचा सुन्नपणा आला होता. कमळीला अंथरुणावर निजवावी किंवा उठून आपण कांहीं करावें असें मला वाटेना. पण मग आईच म्हणाली, " तिला झोंप लागली आहे इंदू. ठेव तिला खालीं. तुला नाहीं का झोंप आली ? "

कमळीपेक्षांसुद्धां आईचा जीव माझ्यासाठीं खालीं–वर होत होता. तिच्या जीवनांत कमळीपेक्षां मला मोठें स्थान होतें. कमळी नसल्यानें जें झालें

नसतें तें मी नसल्यानें झालें असतें. म्हणूनच केवळ नव्हे, पण माझे कष्ट पाहून आईला त्रास होई. माझ्याकडे पाहून ती आपलें दुःख बाजूला सारी आणि माझ्या विसकटून गेलेल्या वृत्तींना एक प्रकारें सांवरीत राही. मी निष्क्रिय झालें कीं ती मला काय करायला हवें तें सुचवी. मी झोंपायचें विसरून गेलें होतें; तें आईनें मला सुचविलें. तिला काय तिच्या चिंता नव्हत्या ? मी पैशाचा आधार देत असलें म्हणून काय झालें ? माणसाला काय तेवढेंच पुरतें ? रात्रंदिवस आमची काळजी करून घरांतले कष्ट तीं उपशीत राही, आणि आपली व्यथा बाजूला सारून आमच्यांत उत्साह भरण्याचा प्रयत्न करी.

आईनें सांगितल्यावर कमळीला मीं अंथरुणार निजविलें. आतां तिचा चेहरा शांत झाला होता. मला वाटलें कीं कमळी कांहीं एवढी वाईट दिसत नाहीं. आणि आतां झोंप लागल्यावर तिच्या तोंडावर वेडसरपणाची छटा कोठें दिसत आहे ? कमळीच्या मिटल्या डोळ्यांत ती वेडेपणाची झांक लपून गेली होती, हें तेव्हां माझ्या ध्यानांतच आलें नाहीं.

कमळीला निजवून मी थकल्या मनानें अंथरुणावर निजलें. आमच्याजवळ सगळ्यांना पांघरुणें घ्यायला पैसे नव्हते. जुनीं पातळें नाहीं तर आईनें शिवलेल्या गोधड्या आम्ही पांघरीत असूं. मी निजतांच आईनें माझ्या अंगावर एक गोधडी घातली. मला अगदीं कसें तरीच झालें. मीं म्हटलें, " अग मीं घेतलं असतं पांघरूण. तूं नीज आतां. दिवसभर काम करून किती दमतेस तूं ! " आईची आतांशा कंबरच दुखत असे. मला वाटलें कीं तिची कंबर जरा चेपून द्यावी. मी उठलें. आईजवळ आलें. तिच्या कंबरेवर हात ठेवीत दाबूं लागलें. आई कांहीं बोलली नाहीं. तिच्या भावना शब्दानें व्यक्त करण्याच्या पलीकडे गेल्या होत्या.

मी पाहात होतें. तिच्या डोळ्यांतून नुसतें पाणी गळत होतें. थोड्या वेळानें आईनें माझा हात धरिला आणि म्हणाली, " मुलं वाईट निघालीं तरी डोळ्यांतनं पाणी येतं, आणि मुलं चांगलीं निघालीं तरी पाणी येतं. जा आतां, नीज. "

मी उठलें. पुन्हा अंथरुणावर पडलें. माझीं भावंडें केव्हांच झोंपीं गेलीं होतीं. सारें कसें स्तब्ध झालें होतें. आई कसला विचार करीत होती कोण जाणे ! मला एकदम दिवेकरांची आठवण झाली. 'कुणी बाई गुणगुणलें' या ओळीची आठवण झाली. पण आत्तां ती मला म्हणावीशी वाटेना. मला सारखी ती आल्याच्या वड्या विकणारी मुलगी, उदबत्त्यांचे पुडे विकणारा तो मुलगा, अंधाराची विहीर, आणि आमची ही कमळी. कमळीचा आणि यांचा काय संबंध होता? पण या साऱ्या गोष्टी आणि आमची कमळी यांचे संबंध आहेत असें मला आपलें उगाचच वाटत होतें. सारीं झोंपलीं होतीं. रात्र कशी तरीच भासत होती. कमळीला पुन्हा फिट् आली तर समजावें म्हणून बारीक दिवा ठेविलेला होता. रोजच तसा असे तो. पण त्याचा उजेड आज मला भयानक वाटत होता. आजारी, वेडी कमळी आणि तो अंधुक दिवा. भिंतीवर पडलेल्या सावल्यांची मला भीतीच वाटूं लागली. खुंटीला कपडे अडकविलेले होते तिथें मला कोणी माणूस उभा असल्यासारखें वाटूं लागलें. एका कोपऱ्यांत ट्रंकांवर ट्रंका ठेविल्या होत्या आणि त्यांच्यावर दिवसभर खालीं असलेली घडवंची ठेविलेली होती. त्यांची सावली दिसत होती एखाद्या आडदांड बैलासारखी आणि त्याच्या शिंगांना लोंबकळणारें मांजर......छे ! कोणी तरी चालत आल्याचा भास होऊं लागला. मधूनच मला वाटलें कीं आपल्या दारावर कोणी टकटक करीत आहे. घरांत कोणी मोठें पुरुष माणूस नाहीं याची मला आज एकदम जाणीव झाली. आणि कशी कोण जाणे, मला दिवेकरांची आठवण झाली. त्यांचा काय संबंध ?

मला वाटलें कीं आईच्याजवळ जाऊन निजावें. तिला सांगावें कीं, 'मला कसली तरी भीति वाटते आहे. माझ्या अंगावरून हात फिरव.' पण मला तसें करणें बरें वाटेना. मी मोठी झालें होतें. लहान मुलासारखें आईच्या पुढचांत......छे ! मीच तर सर्वांना धीर देतें. मला कोण बरें धीर देणार? खुंटीशीं उभ्या असलेल्या बुवाकडे डोळे वटारून पाहतां पाहतांच मीं केव्हां तरी डोळे मिटले.

सकाळीं जागी झालें तेव्हां उन्हें वर आलीं होतीं. घरांतलीं सगळीं उठून आपापल्या उद्योगाला लागलीं होतीं. अंथरुण गोळा करितां करितां पाहिलें. कमळीला शांत झोंप लागली होती. अंधाराबरोबर भीतीच्या सावल्या नाहींशा झाल्या होत्या, आणि मनाचा खिन्नपणाहि विरला होता. सकाळच्या हवेंतच मला वाटतें हा गुण आहे. सकाळ नेहमीं उगवत असते; मावळत नाहीं. त्या सकाळच्याबरोबर आपल्याहि अंतःकरणांत कांहीं तरी उगवायला लागतें.

मला एकदम आठवण झाली; मला पातळें घ्यायचीं होतीं. गेल्या दीड वर्षांत मीं मुळीं पातळेंच घेतलीं नव्हतीं. जरूर असूनहि मला घ्यायला सवडच नव्हती. पांघरुणाची घडी करितां करितां माझ्या मनांत आलें कीं गेलीं सात वर्षें मीं नुसतीं कर्तव्येंच करितें आहे. माझ्या जीवनाचा पेला केवळ कर्तव्यांनींच भरून गेला आहे. माझ्यासाठीं असें मला जगायलाच मिळत नाहीं. आणि जगायचें जगायचें म्हणजे तरी काय, तर दोनाच्याऐवजीं चार पातळें घ्यायचीं. विसाच्याऐवजीं चाळीस रुपये खर्च करायचे. जरा नीटनेटकें राहायचें. लोकांना आपल्या परिस्थितीचा नकटेपणा दिसूं द्यायचा नाहीं. पण मला हें अजून जमत नव्हतें. शिवलेले, रफू केलेले कपडे मला वापरावे लागत होते.

पण मीं आज ठरविलें कीं आपण चांगलीं पातळें घ्यायचीं आणि तीं रोज नेसून फाडून टाकायचीं. चटकन् सारें आंवरून मीं मनीबॅग घेतली आणि आईला सांगून बाहेर पडलें.

मी दुकानांत गेलें. किती तऱ्हेतऱ्हेचीं पातळें तिथें लागलीं होतीं ! जीवनांत गरीबी असली तरी दुकानांत समृद्धि होती. मला शालू हवा असतां तरी तिथें होता. शो केसमध्यें तर शालू नेसल्यावर कसा दिसेल हें दाखविण्यासाठीं एक बाई शालू नेसून चोवीस तास उभी होती. पण मला पंधरा–वीस रुपयांपर्यंतचींच पातळें हवीं होतीं. टेबलापाशीं जाऊन मी म्हणाले, " मला पातळें घ्यायचीं आहेत. "

एवढें म्हणायचाच अवकाश, दुकानदारानें हा ढीग माझ्यापुढें टाकिला. त्यांतलें कोणतें घ्यावें? आपल्याला कोणतें चांगलें दिसेल? किंमतीला कोणतें परवडेल ? याचा विचार करीत पातळाची एकेक घडी मी पाहात होतें. ज्याचा पोत चांगला त्याचा रंग आवडायचा नाहीं. ज्याचा रंग चांगला त्याचे कांठ पसंत पडायचे नाहींत. असें माझें चाललें होतें. सतरा पातळांबद्दल मी दुकानदाराला विचारीत होतें: हें टिकेल का ? विटणार नाहीं ना ? " तो धूमधडाक्यानें उत्तरें देत होता," नाहीं विटणार. टिकेल तर काय झालं ! आजकाल हाच माल खपतो. तुम्हाला आम्ही खोटं कसं सांगूं? नेहमीचं गिऱ्हाइक तुम्ही. "

प्रत्येकाला तो हेंच सांगत होता. एक पंधरा रुपयांच्या पातळासाठीं सारीं जणें किती घासाघीस घालीत होतीं. एकदां घेतलें कीं जसें कांहीं जन्मभर पुरविणार होतें! पण वर्षभर मग घ्यायचें नव्हतें, म्हणून एवढा घोळ पडला होता. माझेंहि तेंच चाललें होतें. मला तर एकदम दोन पातळें घ्यायचीं होतीं. त्यामुळें माझा घोळ जास्तीच पडला होता. टेबलावरचा लुगड्यांचा

खच कमीच वाटून मी कपाटांतलीं, दांडीवरचीं पातळें पाहात होतें. अखेर मीं दुकानदाराला विचारिलें, " ह्या दांडीवरच्या पातळाचा रंग आणि कपाटांतल्या पातळाचा कांठ, असें पातळ नाहीं का तुमच्याकडे ? "

दुकानदार हंसला. म्हणाला, " नाहीं. अजून तसलीं पातळं निघालीं नाहींत. पण यांतलें तुम्हांला कोणतेंच पसंत नाहीं ? "

तोंच कपाटांतल्या एका पातळावर माझी दृष्टि गेली. फार सुंदर होतें तें पातळ. मी म्हणालें, " तें काढा. "

तें पातळ फारच सुंदर होतें. रंग, कांठ, पदर, सारें मला हवें तसें होतें. मी अगदीं हळुवारपणें पातळाच्या पोतावरून हात फिरविला. त्याचा स्पर्शसुद्धां मोठा सुखकारक होता. मीं म्हटलें, " हें इंदुरी आहे का? "

" हो." दुकानदार उत्तरला. मला इंदुरी पातळें फार आवडतात. मोठीं डीसेंट. पुन्हां भारदस्त. रॉयल. " याची किंमत काय बरं ? "

" फक्त पंचवीस रुपये. छान आहे हें पातळ बाई ! घेऊन टाका.'

" पंचवीस रुपये ? शिवाय सेल्स टॅक्स असेलच." म्हणजे जें पसंत' पडतें त्याची किंमत जास्त निघते. हीच तर सर्वांत मोठी आणि कायमची अडचण होती! पण मला एकदम कशी कोण जाणे दिवेकरांची आठवण झाली. मी म्हणालें, " द्या. मात्र दुसरं थोडं कमी किंमतीचं द्या. "

दुसरें पातळ मीं चटकन पसंत केलें. पातळांचें पुडकें पिशवींत घातलें आणि मालकाजवळ बिल देऊन मी बाहेर पडलें. दोन पातळांसाठीं मी आज जवळ जवळ चाळीस रुपये खर्च करून बसलें होतें. चूक होतें आणि बरो-

वरहि होतें. एवढे पैसे खर्च करायची जरूर नव्हती. पण जरुरीशिवाय माणसाला हौशीसाठीं पैसे खर्च करायचा कित्येकदां मोह होतो आणि तो एखादे वेळीं त्याला बळी पडतो. मला मुळीं सारखी दिवेकरांचीच आठवण येत होती. पातळांची पिशवी या हातांतून त्या हातांत झेलीत मी कालचें गाणें म्हणूं लागलें, ' कुणी बाई गुणगुणलें । गीत माझिया हृदयीं ठसलें! '

घरीं आल्यावर पाहिलें तों कमळी अजूनहि झोंपलेलीच होती. म्हणजे एकूण ती बरी होती. मी एक पातळ घेऊन गालाशीं धरिलें आणि आरशापुढें उभी राहिलें. कांहीं बायका तर दुकानांतच आरशापुढें उभ्या राहतात. मला एवढा मोकळेपणा जमत नाहीं. पण हें इंदुरी पातळ छान दिसत होतें. आईलासुद्धां आवडलें. आज उशीर झाला होता म्हणून मी नेसायच्या भानगडींत पडलें नाहीं. आई म्हणाली, "उशीर झाला आहे तुला. लौकर जेवायला ये."

मी जेवून ऑफिसला निघालें. आज मी बस्नें गेलें. पायीं जाण्याएवढा अवधी नव्हता. आणि आज मीं जिवाची चैन करायचें ठरविलें होतें. एखाद्या दिवशीं गेले चार–दोन आणे आणि आरामांत बसमध्यें बसलों तरी कांहीं हरकत नाहीं. बस्मधल्या गादीचा स्पर्श, ती सुरू झाल्यावर आणि थांबतांना तिचे बसणारे हादरे मला फार सुखकारक वाटत होते. जसे कांहीं सुखाचे झोकेच होते ते. फक्त माझ्या शेजारीं कोणी अनोळखी, आणि तोसुद्धां लठ्ठ, काळा पुरुष बसला होता. बाकी दिवेकर रोज ऑफिसांत बस्नें येतात कीं चालत कोण जाणे! सायकलवरून येतात मला वाटतें. उद्यां मी तें पातळ नेसून गेलें कीं मिस् परांजपे माझ्या दंडाला चिमटा घेऊन म्हणेल, 'आज काय झोंक आहे बुवा!' आपण हंसूं. सहज म्हणून पलीकडच्या टेबलाकडे पाहूं. दिवेकर कदाचित् आपल्याचकडे

पाहात असतील. तोंडानें नाहीं तरी दृष्टीनें म्हणतील, 'हें पातळ तुम्हांला छान दिसतंय! छान! रंग किती छान आहे!' 'कुणी बाई' चें गाणें म्हणतच मी बस्‌मधून उतरलें.

ऑफिसमध्यें आज सबंध दिवस छान गेला. दिवेकरांचें टेबल आज रिकामें नव्हतें. आणि माझ्या मनांत माझ्या पातळांचें गुपित घोळत होतें. पण मीं पातळें आणल्याचें कोणालाहि सांगितलें नाहीं.

संध्याकाळीं घरीं आलें. मी आल्याबरोबर कमळीनें माझ्या कमरेला मिठी घातली. मग माझ्या गळ्यांत हात घालून तिनें मला विचारिलें, "कुठें गेली होतीस? आतां जाणार नाहींस? तुझं काय विसरलं आहे?" कमळीनें हे तीन प्रश्न विचारिले कीं समजावें, आज राज्याची व्यवस्था ठीक आहे. आईनें दिलेला गरम गरम चहा घेतला. सगळीं दिसलीं पण राजा दिसला नाहीं. म्हणून आईला विचारणार, तों राजा एका हातांत औषधाची बाटली घेऊन अनवाणी पायांनीं आला. मीं त्याला विचारिलें, "हें रे काय? अनवाणी गेला होतास दवाखान्यांत? वाहाणा कुठें आहेत?"

"म्हणजे काय? तुला माहीत नाहीं का?" राजानें मलाच विचारिलें.

आई गडबडीनें पुढें येत म्हणाली, "तुला सांगायचंच राहिलं. आपला चांभार येऊन गेला, तूं सांगितलं होतंस ना त्याला?"

"काय?"

"वाहाणांना चांगलं पॉलिश करायला? तो म्हणाला, इंदुताईनीं सांगितलं आहे. म्हणून वाहाणा घेऊन गेला आहे. उद्यां देणार आहे परत आणून."

"हूं!" मी उसासा टाकून म्हणालें, "मी त्याला कांहींच सांगितलं नव्हतं."

"मग तो कशाला आला होता?"

"त्याचं बिल द्यायचं राहिलं आहे आई. तें दिलं नाहीं म्हणून तो वाहाणा घेऊन गेला." मला पातळाला धस लागल्यासारखें वाटलें. बिल म्हणतांच राजाला आठवण झाली. पँटच्या खिशांतलें बिल काढून तो म्हणाला, "हें डॉक्टराचं बिल."

बिल बत्तीस रुपये होतें. आईनें माझ्या हातांतून बिल घेतलें, आणि जवळ जवळ ती रागानेंच ओरडली, "काय? इंजेक्शनचे तीस रुपये? मग मेल्यानं आधींच कां नाहीं सांगितलं?"

"सांगितलं असतं तर तूं काय केलं असतंस? इंजेक्शन नको म्हणाली असतीस?"

असें मीं आईला म्हटलें खरें, पण क्षणभर मलासुद्धां कमळीचा राग आला. अजूनसुद्धां ती मला चिकटूनच बसली होती. जळवेसारखी. मीं तिच्या पाठींत एक धपाटा घातला आणि तिला दूर ढकलीत म्हणालें, "हो बाजूला! छळवादी मेली!"

कमळीनें केवढ्यानें तरी गळा काढला. कमळीचें रडणेंसुद्धां कसें तरीच असतें. अभद्रासारखें. घरभर नाचत ती थैमान घालूं लागली. आईनें तिला धरून ठेविलें. मीं मुकाट्यानें पातळांचें पुडकें घेतलें, पायांत वाहाणा घातल्या आणि दुकानाचा रस्ता चालूं लागलें. ओढल्या आवाजानें मीं दुकानदाराला म्हटलें, "हीं पातळं परत घ्या आणि मला पैसे परत द्या."

"कां?" दुकानदार चकित होऊन म्हणाला, "चांगलीं नाहींत का पातळं?"

"चांगलीं आहेत." मला त्यांची किती जरूर होती हें मी त्याला कसें सांगणार? मनःक्षोभ आंवरून मी म्हणालें, "पातळं चांगलीं आहेत. पण सध्यां तेवढी पैशांची सवड नाहीं. भाची आजारी झाली आहे. मला पैसेच परत द्या."

दुकानदारानें पैसे परत दिले. आपलें दैन्य त्याला असें सांगावें लागलें याचें मला फार दुःख झालें. खालच्या मानेनें पैसे घेऊन मी दुकानाची पायरी उतरिलें. वाटलें, कीं दिवसभर पैशासाठीं मरून अखेर आपण पराभूत आहोंत—पराभूत आहोंत. रस्त्यानें पाहात होतें कीं तीं कालचीं दोन मुलें कोठें दिसतात का? छे! तीं भेटलीं नाहींत. दुकाना-दुकानांतून शालू नेसलेल्या बाया जणुं माझा उपहास करीत होत्या. त्यांना पाहातांच मला दिवेकरांची आठवण झाली. मीं माझ्या रफू केलेल्या पातळाकडे पाहिलें आणि वाटलें कीं उद्यां दिवेकरांच्याकडे पाहाण्याचें धारिष्टच आपल्याला होणार नाहीं.

---

४. .... शोध

नेहमींप्रमाणें उमाबाई आपल्या कचेरींत टपाल चाळीत बसल्या होत्या. अनाथाश्रमाची चौकशी करणारीं पत्रें, आश्रमाला मदत करणाऱ्या आश्रयदात्यांचीं पत्रें व इतर व्यावहारिक गोष्टींचीं बिलें, अशीं ठराविक प्रकारचीं पत्रें त्या नेहमींच्या संवयीनें हातावेगळीं करीत होत्या. आणि असें करितांना आश्रमांतील निरनिराळ्या मुलींची, मुलांची निरनिराळ्या प्रकारची व्यवस्था कशी करावी आणि त्यांचे खर्च कसे भागवावे ही काळजी त्यांना रोजच्याप्रमाणेंच बेचैन करीत होती. लोकांनीं कितीहि मदत केली तरी त्यांच्या संख्येच्या व अडचणींच्या मानानें ती कमीच पडत असे. कितीहि प्रयत्न केले तरी अखेर या अनाथ माणसांचें जीवित लोकांच्या सहानुभूतीवरच अवलंबून होतें.

–असा विचार करीत असतांनाच त्यांनीं एक जांभळ्या रंगाचें पाकीट फोडलें. त्यांनीं अगोदर पत्रावरील सही वाचून घेतली. नांव अर्थात् अनोळखी होतेंच. पण तें टोपण नांव होतें. "ताई दातार" अशी सुट्या पण बेडौल अक्षराची ती सही होती. एका जाड, गोऱ्या, वयस्क बाईची मूर्ति त्यांच्या डोळ्यांसमोर आली. बाईनीं लिहिलें होतें :–

"पत्र लिहिण्याचें कारण गेलीं पांच-सात वर्षें मी रक्तदाबाच्या विकारानें आजारी असतें. आमच्या घरांत आम्हां दोघांशिवाय कोणी नाहीं. तेव्हां आपल्या आश्रमांतील एखादी मुलगी मला मिळूं शकेल काय? तिनें आमच्या घरींच राहावें; घरचें काम करावें. तिची सर्व प्रकारची जबाबदारी मी घेईन. एवढेंच काय, पण मुलगी स्वभावानें चांगली निघेल तर मी तिला पोटच्या मुलीप्रमाणें मानीन. कारण मुलांच्याबाबत मी अभागी आहें!

"मात्र माझी एकच अट आहे. मुलगी कामसू असावी आणि सुरूप नसावी. मी माझ्या आजारीपणाच्या काळजींत असणार; तिच्यावर मी लक्ष कुठें ठेवूं?"

उमाबाईंना हंसूं आलें. त्यांनीं पत्र टेबलाच्या खणांत ठेवून दिलें आणि इतर पत्रें पाहून त्या खुर्चीवर रेलून बसल्या. एकेक मुलगी त्यांच्या डोळ्यांसमोर येऊन गेली. आणि नुकत्याच सहा महिन्यांपूर्वीं दाखल झालेल्या पंधरा वर्षांच्या नमूचें त्यांना स्मरण झालें. ताई दातारांच्या अटींत बसेल अशी नमू ही मुलगी आहे खरी, असें त्यांना वाटलें. मुलगी आश्रमांत आली कीं तिचा प्रश्न सुटल्यासारखा वाटतो. कारण तात्पुरत्या प्रसंगांत तिला आधार मिळालेला असतो. पण ती अडचण संपली कीं मुलीच्या आयुष्याचें काय करावें, तिला स्वतंत्र आणि सुशिक्षित जीवित कसें मिळवून द्यावें हा फार मोठा प्रश्न असतो. सर्वच मुली स्वावलंबनानें जगण्याची अिच्छा करणाऱ्या, तसे प्रयत्न करणाऱ्या असतात असें नव्हे. नमू ही अशी मुलगी होती. बुद्धीनें सामान्य होती. आपण कांहीं शिकावें अशी तिला इच्छा नव्हती. तिला फक्त घरगुती कामांची आवड होती. पण तेवढ्या आवडीनें तिचा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता.

ह्या मुलीला कोणीं कायमची सांभाळून हिचें कल्याण झालें तर उमाबाईंच्या पुढचा अेक प्रश्न सुटणार होता. त्यांनीं नमूला हांक मारिली आणि तिची संमति विचारिली.

नमू विचार करीत उभी होती. आणि उमाबाई मधून मधून तिच्या-कडे दृष्टिक्षेप टाकीत होत्या. नमूचा चेहराच असा विलक्षण खाबडखुबड होता कीं त्यावरून तिच्या मनांतले भाव ओळखणें अवघड होतें. कपाळ पुढें आलेलें आणि डोळे अेकदम आंत गेलेले. जणुं कांहीं दोन खोल अंधाऱ्या विहिरी. नाक सरळ नाहीं—नकटें नाहीं. जिवणीच्या खालीं दांतांनीं गर्दी केली होती. पायांवर पाय ठेवून अढी घालावी तसें अेका दांताच्या पुढें दुसरा दांत पीळ घातल्यासारखा. नमू हंसली कीं ती दांतांची गर्दी दिसे. नमू रोड होती. त्यामुळें तिच्या गालांच्या हाडांवरून कातडें ताणल्यासारखें वाटे. नमूचे केंस बरे होते; पण ते घट्ट, आवळून बांधल्या-मुळें आंबाडा अगदीं मागें गेला होता आणि डोकें चपटें वाटत होतें. तिच्या त्या किंचित् उंच, पाठींत पोक काढून उभें राहण्याच्या लकबीकडे पाहात त्यांनी पुन्हां विचारिलें, " काय वाटतं तुला ?"

क्षणभर थांबून नमू म्हणाली, " तुम्हांला काय वाटतं? मला कांहींच समजत नाहीं. तुम्ही सांगाल तसं मी करीन. "

तिच्या उत्तरानें उमाबाईंच्या शांत चेहऱ्यावर दयेची छटा उमटून गेली. त्यांनीं आपल्या पिकत चाललेल्या केंसांवरून हात फिरविला. आणि टेबलावर उगीचच पेन्सिलीचा आघात करून त्या म्हणाल्या, " मला वाटतं तूं महिना—पंधरा दिवस तिथें राहून ये, कसं वाटतं तें पाहा, आणि मग नक्की ठरवूं. "

जरा थांबून त्यांनीं तिला जवळच्या खुर्चीवर बसायला सांगितलें. आणि त्या म्हणाल्या, " वाईट वाटून घेऊं नकोस. मी म्हणतें हें तुला कळेल तरी कीं नाहीं कोण जाणे! तें कळावं एवढं तुझं वयहि नाहीं. प्रसंगांत सांपडलेल्या माणसांना बहुधा आयुष्य घडेल तसं घडूं द्यावं लागतं. पण एखादी संधि अशी येते कीं आपल्या मनाचा निश्चय करून आपलं कल्याण करून घ्यावं लागतं. बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करावं लागतं. दातारबाई चांगल्या असतील, तर तुझं चांगलंहि होईल. जा आतां विचार कर."

उमाबाईंनीं तिच्या पाठीवर मायेनं हात ठेविला आणि नमू पुन्हा आंत निघून गेली.

उमाबाईंनीं दातारबाईंना पत्र लिहिलें–" आमच्याकडे आपल्याला हवी तशी एक मुलगी आहे. पण आपण समक्ष येऊन भेटावें. अधिक खुलासा प्रत्यक्षच होऊं शकेल."

पत्र गड्याजवळ देतां देतां त्यांच्या मनांत आलें, आपण आपल्या जवळच्या कुत्र्याचें पिलूं पाळावयास द्यावें तसें या अनाथ माणसांचें....! त्यांना फार चमत्कारिक वाटलें. किती वर्षांची ही संवय असूनहि त्यांना तें बोंचल्याशिवाय राहिलें नाहीं. आपल्या कुंकुमविरहित कपाळावरून त्यांनीं हात फिरविला. आपणहि अनाथच आहोंत. तेव्हांपासूनच या अनाथाश्रमांत आपण विनामूल्य काम करीत आहोंत. पण आपल्याला एक मुलगा आहे. आपल्या नवऱ्याचा पैसा आहे. आपल्याजवळ यांतलें कांहींच नसतें तर आपण खरेंच अनाथ झालों असतों. या नमूसारखेंच आपल्याला..? पण नमू सनाथ असून अनाथ आहे. नुसता नवरा असून म्हणून बाई सनाथ होत नाहीं.

घड्याळांत साडेनवाचा ठोका पडला. अनाथाश्रमाच्या चालकांची आज मीटिंग होती. केवळ नमूचाच विचार करणें त्यांना शक्य नव्हतें. टेबलावरची एक फाइल उचलून त्या वाचूं लागल्या.

दोन तीन दिवसांनींच ताई दातार आणि श्री. दातार आश्रमांत आले. आश्रमासंबंधीं थोडी फार माहिती विचारून झाल्यावर उमाबाईंनीं नमूला बोलाविणें पाठविलें. नमू येऊन उभी राहिली. नमूचा चेहरा पाहून तिच्याबद्दल प्रेम, आपलेपणा वाटावा असें तिचें व्यक्तिमत्त्व नव्हतें. तरी तिचें लहान वय आणि चेहरा तिच्याबद्दल मनांत सहानुभूति निर्माण करीत. ताईंना अशीच तिच्याबद्दल सहानुभूति वाटली. उपकारांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेल्या या मुलीशीं थोडें फार बोलून झाल्यावर नमू पुन्हा आपल्या कामाला निघून गेली आणि ताई उमाबाईंना म्हणाल्या, "ही मुलगी चालेल आम्हांला, चालेल ना हो?"

त्यांच्या यजमानांनीं मान डोलाविली. ते म्हणाले, "चालेल. कुणीहि चालेल. फक्त तिनं चांगलं वागलं पाहिजे. काम केलं पाहिजे. बरं, पण हिची आधींची हकीकत सांगा. ही तुमच्या आश्रमांत कशी आली? कधीं आली?"

"तिला येऊन सहाच महिने झाले. हिचे आईबाप अगदीं लहानपणींच वारले. त्यामुळें चार दिवस इकडे, चार दिवस तिकडे अशी ही कशी तरी वाढली. अखेर हिचं लग्न एका वयस्क पाणक्याशीं झालं. आणि तेव्हांपासून हिचे हाल आणखीच सुरू झाले. तो व्यसनी होता. त्यानं तिला मारावी, उपाशी ठेवावी; आणि मला वाटतं या लहान मुलीनं त्याची धास्ती घेतली. तिच्या अंगावर माराच्या खुणा आहेत. या अनाथ मुलीची दाद कोण घेणार? शेवटीं कुणी तरी हा रस्ता तिला दाखविला आणि ती इकडे आली."

" मग तो तिचा नवरा पुन्हा आला नाहीं हिला न्यायला? " ताईंनीं विचारिलें.

" नाहीं आला. लग्न होऊन वर्षभर झालं असेल. नमू वयानं फक्त चौदा पंधरा वर्षांची आहे. आणि तिचा नवरा तिच्या बापापेक्षांहि मोठा वाटेल असा आहे. व्यसनी, गलिच्छ अशा नवऱ्याशीं हिची गांठ. तारुण्यांत पाऊल टाकण्यापूर्वीच या मुलीचं हें असं होऊन बसलं आहे. "

उमाबाई थांबल्या. ताई आणि त्यांचे यजमान उद्गारले, "अरेरे! "

उमाबाई म्हणाल्या, " आश्रमांत येण्यापूर्वींचा हा इतिहास आहे. इथें येऊन तिला फार दिवस झाले नाहींत. गेल्या एक दोन महिन्यांत तिचं मन शांत होऊं लागलं आहे. प्रथम ती कावऱ्याबावऱ्यासारखी वागे. कशांतच तिचं लक्ष लागत नसे. पण आतां मात्र आम्हांला ती आश्रमाच्या कामांत पुष्कळ मदत करिते. मुलगी कष्टाळू आहे. "

दातार–दांपत्य निघून गेलें. आणि सगळ्या गोष्टी आश्रमाच्या नियमाप्रमाणें होऊन चार दिवसांनीं नमूची रवानगी दातारांच्या घरीं झाली.

नमूच्या आयुष्याचें नवें पान उघडलें ! नवी सकाळ उजाडली. नवें घर, नवीं माणसें, नवीं कामें दिसूं लागलीं. ती जणूं नव्याच जगांत आली. रोपटें एकसारखें या जागेंतून त्या जागेंत लावावें तसें तिचें झालेलें होतें. एकाच प्रकारचे संस्कार, एका ठराविक वळणाचे संस्कार नमूवर होणें शक्यच नव्हतें. नेमकें कसलेंच वळण तिच्या मनाला लागलें नव्हतें. त्या कोंवळ्या जीवावर अगदीं बालपणापासून एकच संस्कार घडत आला होता, कीं परिस्थिति बदलली कीं आपण बदलावें. ज्यांच्याजवळ

राहावयाचें त्यांची मर्जी सांभाळावी. पुन्हा पहिल्यापासून नवा धडा गिरवावा आणि कोणताहि धडा आत्मसात् करूं नये, कीं कोणत्याहि धड्यावर स्वतः विश्वसून राहूं नये. आज इथें, उद्या तिथें; आज हें, उद्या तें; आज याचें महत्त्व, उद्या त्याचें महत्त्व. स्वतःचें महत्त्व कोठें आहे ? आहे किंवा नाहीं....पण हें कळण्याचें नमूचें वय नव्हतें, समजहि आलेली नव्हती. फक्त आपली इकडून तिकडे परवड होते एवढेंच तिला कळत होतें. आणि असल्या या परवडीचीच संवय झालेल्या माणसाला सुखवस्तु माणसाइतकें तें जाणवतहि नाहीं.

पण किती झालें तरी नमू एक लहान मुलगी होती आणि ती ज्या परिस्थितींतून जात होती तिनें तिचा जीव हळवा झाला होता. आपण इकडे आलों खऱ्या; पण आपल्याला उमाबाईंची संवय झाली होती. त्यांचा विश्वास उत्पन्न झाला होता....त्यांचा तिला आधार वाटत होता. त्या आधाराची, विश्वासाची मोडतोड करून आतां या 'ताई' या नांवाच्या नव्या बाईचा आधार, विश्वास, प्रेम....हें सारें पुन्हा नव्यानें करावयाचें. ही सारी खटपट पुन्हा पहिल्यापासून असें तिला वाटत होतें. त्यामुळें एक प्रकारची अस्थिरता तिला व्याकुळ करीत होती. उगवलेला दिवस तिच्यासमोर थरथरत होता. भविष्य हेलकावे घेत होतें. आणि अज्ञानी नमू कळून न कळून आंतल्या आंत हादरून जात होती. कुठेंहि गेलों तरी आपण नोकर असतों आणि आपल्याला सारखें दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागावें लागतें हें तिला आतां पाठ झालें होतें.

जें जें काम दिसेल तें तें करावें, अंग चोरून उभें राहावें, आवळून धरल्यासारखें चालावें, असें तिचें चाललें होतें.

पण ताई सहृदय होत्या. आपल्या वागणुकीनें त्यांनीं तिच्यांतील परकेपणाची, नोकर असल्याची भावना काढून टाकली. त्या तिला आपली

मुलगीच समजूं लागल्या. त्यांचा तिच्यावर जीव जडूं लागला. त्या तिचा कपडालत्ता हौसेनें घेत. चार पातळें जास्त घेत. आपल्या हातांतली सोन्याची बांगडी त्यांनीं तिच्या हातांत घातली. या मुलीची हौस आपल्याशिवाय कोण करणार असें त्यांना वाटे. आपल्याबरोबर त्या तिला सभा–समारंभाला घेऊन जात. नमूला स्वतःच्या बरोबर ठेवण्यांत त्यांचा आणखीहि हेतु होताच.

या वागण्यानें नमूला त्यांचा आधार वाटूं लागला. विश्वास वाटूं लागला. दिवस थरथरावयाचे थांबले. दिवस ओळखीचे झाले. त्या घरांतील वस्तूंची जानपछान झाली. या कुंडींत आपलें रोपटें मूळ धरूं लागलें आहे एवढी खात्री तिच्या जीवाला वाटूं लागली. तें अवघडून उभें राहणें, बांधल्यासारखें चालणें आपोआपच नाहींसें झालें.

ताई तिला सांगत, "नमू, केंस जरा सैल बांधीत जा. एवढ्यांतच आजीबाई होऊं नकोस. पोक काढून चालूं नकोस."

हें नमूला नवीन होतें. ताईंनीं तिला आग्रह करावा, "अग दोन घास खाल्ल्याशिवाय वाढ कशी व्हायची तुझी ? खा, इवलासा भात खा."

घरांत केलेली कोणतीहि वस्तु नमूला दिल्याशिवाय त्या दांपत्यानें कधीं खाल्ली नाहीं.

त्यामुळें नमू हवें तें काम होसेनें करी. ताईंना बरें नसलें तर नमूचा जीव घाबरा होई. सारखी ती त्यांच्या सेवेला हजर राही. नमूनें ताईंच्या पोटीं जन्म घेतला नव्हता, एवढेंच.

कारण तिचा अव्यवस्थितपणा, धांदरटपणा ताई खपवून घेत. तिच्या लुगड्याची घडी घालीत. ताईंच्या प्रेमानें नमू सुखावत चालली होती